| ९९ | FRL | राजकोषीय उत्तरदायित्व कायदा |
| १०० | FSI | चटई क्षेत्र निर्देशांक |
| १०१ | FTWZ | मुक्त व्यापार वखार प्रक्षेत्र |
| १०२ | FW | कुटुंब कल्याण |
| १०३ | FWTI | शेतकरी महिला प्रशिक्षण संस्था |
| १०४ | FY | वित्तीय वर्ष |
| १०५ | FYP | पंचवार्षिक योजना |
| १०६ | GA | भौगोलिक क्षेत्र |
| १०७ | GDDP | एकूण जिल्हा देशांतर्गत उत्पादन |
| १०८ | GDDPCI | एकूण जिल्हा देशांतर्गत दरडोई उत्पन्न |
| १०९ | GDP | एकूण देशांतर्गत उत्पादन |
| ११० | GGE | शिक्षणातील स्त्री पुरुष तफावत |
| १११ | GH | घाट क्षेत्र |
| ११२ | GIA | सहायक अनुदान |
| ११३ | GMIDC | गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ |
| ११४ | GMR | ग्रॅन्धी मल्लिकार्जून राव (जीएमआर) |
| ११५ | GoI | भारत सरकार |
| ११६ | GoM | महाराष्ट्र शासन |
| ११७ | GR | शासन निर्णय |
| ११८ | GSDA | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा |

| | | |
|---|---|---|
| ११९ | GSDP | एकूण राज्यांतर्गत उत्पादन (जीएसडीपी) |
| १२० | GSP | वस्तु व सेवा यांवरील कर |
| १२१ | Ha. | हेक्टर |
| १२२ | HDI | मानव विकास निर्देशांक |
| १२३ | HIG | उच्च उत्पन्न गट |
| १२४ | HIV | एच.आय.व्ही. |
| १२५ | HLEG | उच्चस्तरीय तज्ञ गट |
| १२६ | HMIS | आरोग्य व्यवस्थापन माहिती यंत्रणा |
| १२७ | Hon'ble | माननीय |
| १२८ | HR | मनुष्यबळ |
| १२९ | HRA | घरभाडे भत्ता |
| १३० | HRD | मनुष्यबळ विकास |
| १३१ | HRM | हाय रेन फॉल झोन विथ सॉईल फ्रॉम मिक्स्‌ड पॅरेंट मटेरियल (एचआरएम) |
| १३२ | HSC | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र |
| १३३ | HW | आरोग्य कार्यकर्ता |
| १३४ | HYV | उच्च उत्पन्न वाण |
| १३५ | I&BC | निर्देशांक व अनुशेष समिती |
| १३६ | IAM | कृषि यांत्रिकी संस्था |
| १३७ | IAS | भारतीय प्रशासकीय सेवा (भा.प्र.से) |
| १३८ | IBSSA | कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रोत्साहनाधारित योजना |
| १३९ | ICA | सिंचनयोग्य लाभक्षेत्र |
| १४० | ICAR | भारतीय कृषि संशोधन परिषद |
| १४१ | ICDS | एकात्मीक बाल विकास योजना |
| १४२ | ICT | माहिती व  दळणवळण तंत्रज्ञान |
| १४३ | ICTC | एकात्मीकृत समुपदेशन व उपचार केंद्र |
| १४४ | IEA | स्वतंत्र मूल्यांकन अभिकरण |
| १४५ | IEM | औद्योगिक उपक्रम प्रस्तावपत्रे |
| १४६ | IEO | स्वतंत्र मूल्यांकन कार्यालय |
| १४७ | IEPL | आयडियल एनर्जी प्रोजेक्ट लिमिटेड (आयईपीएल) |
| १४८ | IGIDR | इंदिरा गांधी विकास संशोधन संस्था |
| १४९ | IID | एकात्मिक  पायाभूत विकास |

| | | |
|---|---|---|
| १५० | IIM | भारतीय व्यवस्थापन संस्था |
| १५१ | IIPS | आंतरराष्ट्रीय लोकसंख्याशास्त्र संस्था |
| १५२ | IIT | भारतीय तंत्रशास्त्र संस्था (आयआयटी) |
| १५३ | IIUS | औद्योगिक पायाभूत सुविधा श्रेणीवाढ योजना |
| १५४ | IMF | आंतरराष्ट्रीय नाणे निधी |
| १५५ | IMFL | भारतीय बनावटीचे विदेशी मद्य |
| १५६ | IMR | बाल मृत्यू दर |
| १५७ | INM | सघन पोषाहार व्यवस्थापन |
| १५८ | IP | सिंचन क्षमता |
| १५९ | IPHS | भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके |
| १६० | IRC | इंडियन रोड कॉंग्रेस |
| १६१ | ISSP | भारतीय सांख्यिकी विवरण प्रकल्प |
| १६२ | IT | माहिती तंत्रज्ञान |
| १६३ | ITDP | एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प |
| १६४ | ITES | माहिती तंत्रज्ञानक्षम सेवा (आयटीइएस) |
| १६५ | ITI | औद्योगिक प्रशिक्षण संस्था |
| १६६ | JNNURM | जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान |
| १६७ | JNPT | जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) |
| १६८ | KEM | मुंबई वगळता कोकण |
| १६९ | Kg.\Ha | प्रतिहेक्टर\किलोग्रॅम |
| १७० | Khar Pan Patta | अमरावती व अकोला जिल्हयातील क्षारित क्षेत्र |
| १७१ | Kharif Season | खरीप हंगाम |
| १७२ | KIDC | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ |
| १७३ | KM | कि.मी. |
| १७४ | KT | कोल्हापूर पध्दतीचे |
| १७५ | KVI | की व्हॅल्यूम निर्देशक |
| १७६ | KVK | कृषि विज्ञान केंद्र |
| १७७ | KW | किलोवॅट |
| १७८ | KWH | ताशी किलो वॅट |
| १७९ | L & JD | विधि व न्याय विभाग |
| १८० | LHV | महिला आरोग्य प्रचारक |

| | | |
|---|---|---|
| १८१ | LIG | अल्प उत्पन्न गट |
| १८२ | LPCPD | दरडोई प्रतिदिन प्रतिलिटर |
| १८३ | LS | स्थानिक क्षेत्र |
| १८४ | LWE | डावा जहाल मतवाद |
| १८५ | M | मीटर |
| १८६ | $m^2$ | चौरस मीटर |
| १८७ | $m^3$ | घन मीटर |
| १८८ | MAAS | महाराष्ट्र मानवशास्त्र संघटना |
| १८९ | MADC | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी |
| १९० | MAFSU | महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफ्सु) |
| १९१ | MAHAGENCO | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित |
| १९२ | MAIC | महाराष्ट्र कृषि औद्योगिक महामंडळ |
| १९३ | MAIDC | महाराष्ट्र कृषि औद्योगिक विकास महामंडळ |
| १९४ | Marathwada | औरंगाबाद महसूल विभाग |
| १९५ | MASA | महाराष्ट्र कृषि सांख्यिकी अभिकरण |
| १९६ | MAX | कमाल |
| १९७ | MBA | व्यवसाय प्रशासनातील पदव्युत्तर पदवी |
| १९८ | MBBS | एम.बी.बी.एस |
| १९९ | MCAER | महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद |
| २०० | MCAR | महाराष्ट्र कृषि संशोधन परिषद |
| २०१ | MCL | महानदी कोलफिल्ड मर्यादित |
| २०२ | Mcum | दशलक्ष घनमीटर |
| २०३ | MDR | प्रमुख जिल्हा मार्ग |
| २०४ | MDRC | महाराष्ट्र विकास संशोधन परिषद |
| २०५ | MEDC | महाराष्ट्र आर्थिक विकास परिषद |
| २०६ | MEGS | महाराष्ट्र रोजगार हमी योजना |
| २०७ | MFP | किमान पायाभूत सोई कार्यक्रम |
| २०८ | MGNREGA | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम |
| २०९ | MHADA | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) |
| २१० | MHRD | मनुष्यबळ विकास मंत्रालय |
| २११ | MI | लहान पाटबंधारे |

| | | |
|---|---|---|
| २१२ | MIDC | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) |
| २१३ | MIG | मध्यम उत्पन्न गट (एमआयजी) |
| २१४ | MIHAN | मल्टीनोडल इंटरनॅशनल कार्गो हब ॲट नागपूर (मिहान) |
| २१५ | MIN | किमान |
| २१६ | MIS | व्यवस्थापन माहिती यंत्रणा |
| २१७ | MIT | महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान |
| २१८ | MJP | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| २१९ | MKVDC | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ |
| २२० | MLA | विधानसभा सदस्य (आमदार) |
| २२१ | MLC | विधानपरिषद सदस्य (आमदार) |
| २२२ | MLD\mld | प्रतिदिन दशलक्ष लिटर |
| २२३ | MLLA | महाराष्ट्र जमीन भाडेपट्टा अधिनियम |
| २२४ | MM | माजी मालगुजारी (नागपूरच्या संदर्भात) |
| २२५ | MM | मिलीमीटर |
| २२६ | Mm3 | दशलक्ष घन मीटर |
| २२७ | MMR | माता मृत्यू दर |
| २२८ | MNC | बहुराष्ट्रीय कंपनी |
| २२९ | MNP | किमान गरजा कार्यक्रम |
| २३० | MoEF | पर्यावरण व वन मंत्रालय |
| २३१ | MoWRGOI | जलसंपदा मंत्रालय, भारत सरकार |
| २३२ | MP | संसद सदस्य |
| २३३ | MPCB | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ |
| २३४ | MPCE | मासिक दरडोई उपभोक्ता खर्च |
| २३५ | MPHW | बहुउद्देशीय आरोग्य कार्यकर्ता |
| २३६ | MPLAD | संसद सदस्य स्थानिक क्षेत्र विकास |
| २३७ | MPR | मासिक प्रगती अहवाल |
| २३८ | MPW | बहुउद्देशीय कार्यकर्ता |
| २३९ | MR | मध्यम पर्जन्यवृष्टी क्षेत्र |
| २४० | MSE-CDP | सूक्ष्म व लहान उपक्रम – सामूहिक विकास कार्यक्रम |
| २४१ | MSH | प्रमुख राज्य महामार्ग |
| २४२ | MSME | सूक्ष्म,लहान व मध्यम उपक्रम |

| | | |
|---|---|---|
| २४३ | MSP | किमान आधारभूत किंमत |
| २४४ | MSSIDC | महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ |
| २४५ | MT | मॅट्रिक टन |
| २४६ | MTA | प्रतिवर्षी दशलक्ष टन |
| २४७ | MTDC | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ |
| २४८ | Mtr. | मीटर |
| २४९ | MTSE | महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा |
| २५० | MVET | महाराष्ट्र व्यावसायिक व शिक्षण प्रशिक्षण |
| २५१ | MW | मेगावॅट |
| २५२ | MWIC | महाराष्ट्र जल व पाटबंधारे आयोग |
| २५३ | MWRRA | महाराष्ट्र जलसंपदा विनियमन प्राधिकरण |
| २५४ | NABARD | राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक |
| २५५ | NAREGA | राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम |
| २५६ | NASSCOM | नॅसकॉम |
| २५७ | N-CADA | नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरण |
| २५८ | NFHS | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण |
| २५९ | NGO | स्वयंसेवी संस्था |
| २६० | NH | राष्ट्रीय महामार्ग |
| २६१ | NHDP | राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्प |
| २६२ | NHP | राष्ट्रीय आरोग्य योजना |
| २६३ | NIMZ | राष्ट्रीय गुंतवणूक व उत्पादन क्षेत्र |
| २६४ | NIT | राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था |
| २६५ | NNMB | राष्ट्रीय पोषाहार संनियंत्रण केंद्र |
| २६६ | NPK | नायट्रोजन, फॉस्फरस आणि कॅलशिअम (पोटॅशिअम) |
| २६७ | NPV | सध्याचे निव्वळ मूल्य |
| २६८ | NRHM | राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान |
| २६९ | NSSO | राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्था |
| २७० | NVEQF | राष्ट्रीय व्यावसायिक शैक्षणिक अर्हता आराखडा |
| २७१ | OCR | ऑप्टिकल कॅरेक्टर रेकग्नीशन |
| २७२ | ODR | इतर जिल्हा मार्ग |
| २७३ | OTSP | जनजाति क्षेत्राबाहेरील उपयोजना |

| | | |
|---|---|---|
| २७४ | P.G. | पदव्युत्तर |
| २७५ | PAR | मूल्यांकन कार्यक्रम अहवाल |
| २७६ | PCI | दरडोई उत्पन्न |
| २७७ | PDS | सार्वजनिक वितरण व्यवस्था |
| २७८ | PESA | अनुसूचित क्षेत्रासाठी पंचायत विस्तार |
| २७९ | PHC | प्राथमिक आरोग्य केंद्र |
| २८० | PHCC | प्राथमिक आरोग्य शुश्रूषा केंद्र |
| २८१ | PHN | सार्वजनिक आरोग्य परिचारिका |
| २८२ | PKV | पंजाबराव कृषि विद्यापीठ |
| २८३ | PMGSY | प्रधानमंत्री ग्राम सडक योजना |
| २८४ | PPP | सार्वजनिक खाजगी सहभाग |
| २८५ | PPP-GDP | सार्वजनिक खाजगी सहभाग– एकूण देशांतर्गत उत्पन्न |
| २८६ | PRI | पंचायत राज संस्था |
| २८७ | PSI | प्रोत्साहनाची प्रकर्षित योजना |
| २८८ | PSU | सार्वजनिक क्षेत्र उपक्रम |
| २८९ | PTG | आदिम आदिवासी गट |
| २९० | PURA | ग्रामीण क्षेत्रासाठी नागरी सुविधांसाठी तरतूद |
| २९१ | PV | फोटोव्होल्टेइक |
| २९२ | PWD | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| २९३ | R&D | संशोधन व विकास |
| २९४ | Rabi Season | रब्बी हंगाम |
| २९५ | RAMM | प्रादेशिक कृषि यांत्रिकीकरण अभियान |
| २९६ | RCH | पुनर्प्रजनन व बाल आरोग्य |
| २९७ | RD | महसूल विभाग |
| २९८ | RDB | प्रादेशिक विकास मंडळ |
| २९९ | RDC | प्रादेशिक विकास आयुक्त |
| ३०० | RDD | ग्राम विकास विभाग |
| ३०१ | RDP | रस्ते विकास योजना |
| ३०२ | REDD | वृक्षतोड आणि ओसाड झालेल्या वनजमिनी यांच्यापासून होणारे उत्सर्जन कमी करणे |
| ३०३ | RF | राखीव वन |
| ३०४ | RFI | ग्रामीण वित्तीय संस्था |

| | | |
|---|---|---|
| ३०५ | RH | ग्रामीण रुग्णालय |
| ३०६ | RoM | उर्वरित महाराष्ट्र (पुणे, नाशिक व कोकण महसूल विभाग) |
| ३०७ | Rs. | रुपये |
| ३०८ | RTE | शिक्षणाचा हक्क |
| ३०९ | RTM | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज |
| ३१० | RUSA | राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियान |
| ३११ | SC | अनुसूचित जाती |
| ३१२ | SCD | मृत्युच्या कारणांचे सर्वेक्षण |
| ३१३ | SCSP | अनुसूचित जाती उपयोजना |
| ३१४ | SD | प्रमाण विचलन |
| ३१५ | SDB | वैधानिक विकास मंडळ |
| ३१६ | SDP | देशांतर्गत राज्य उत्पादन |
| ३१७ | SEARCH | सामूहिक आरोग्याशी संबंधित शिक्षण, कृती व संशोधन संस्था (सर्च) |
| ३१८ | SECL | साऊथ ईस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड |
| ३१९ | SEZ | विशेष आर्थिक क्षेत्र |
| ३२० | SH | राज्य महामार्ग |
| ३२१ | SHC | उप आरोग्य केंद्र |
| ३२२ | SHG | स्वयंसहायता गट |
| ३२३ | SME | लहान व मध्यम उपक्रम |
| ३२४ | SNDT | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी |
| ३२५ | SPV | विशेष प्रयोजन वाहन |
| ३२६ | Sq.Ft. | चौरस फूट |
| ३२७ | Sq.Km. | चौ.कि.मी. |
| ३२८ | SRI | सघन भातरोपण पध्दती |
| ३२९ | SRTM | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा |
| ३३० | SS | सिकलसेल सोसायटी |
| ३३१ | SS Projects | राज्य क्षेत्र प्रकल्प |
| ३३२ | SSA | सर्वशिक्षा अभियान |
| ३३३ | SSC | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (एस.एस.सी) |
| ३३४ | SSI | लघु उद्योग |
| ३३५ | SSSP | राज्य सांख्यिकी सक्षमीकरण प्रकल्प |

| | | |
|---|---|---|
| ३३६ | ST | अनुसूचित जमाती |
| ३३७ | Std. | इयत्ता |
| ३३८ | STDEV | प्रमाण विचलन |
| ३३९ | TAC | आदिवासी सल्लागार समिती |
| ३४० | Tb | क्षयरोग (टी.बी.) |
| ३४१ | TCS | टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस |
| ३४२ | TDD | आदिवासी विकास विभाग |
| ३४३ | TDI | तालुका विकास निर्देशांक |
| ३४४ | TDR | विकास हक्कांचे हस्तांतरण |
| ३४५ | TFR | एकूण जननक्षमता दर |
| ३४६ | Th.Ha. | हजार हेक्टर |
| ३४७ | TIDC | तापी पाटबंधारे विकास महामंडळ |
| ३४८ | TINA | कोणताही पर्याय नाही |
| ३४९ | TMC | दहा दशलक्ष घनफूट |
| ३५० | ToR | विचारार्थ विषय |
| ३५१ | TP | पारगमन परवाना (टीपी) |
| ३५२ | TPP | औष्णिक ऊर्जा संयंत्र |
| ३५३ | TRDF | तांत्रिक संशोधन व विकास निधी |
| ३५४ | TR-I | संक्रमण क्षेत्र-एक |
| ३५५ | TRTI | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था |
| ३५६ | TSP | जनजाति उपयोजना |
| ३५७ | TTR-2 | संक्रमण क्षेत्र-दोन |
| ३५८ | TUF | तंत्रविज्ञान श्रेणीवाढ निधी |
| ३५९ | UGC | विद्यापीठ अनुदान आयोग |
| ३६० | UHC | सार्वत्रिक आरोग्य देखभाल |
| ३६१ | UIDSSMT | लहान व मध्यम शहरांसाठी नागरी पायाभूत विकास योजना |
| ३६२ | ULB | नागरी स्थानिक संस्था |
| ३६३ | UMPP | अतिभव्य वीज संयंत्र |
| ३६४ | UNDP | संयुक्त राष्ट्रांचा विकास कार्यक्रम |
| ३६५ | UNFCCC | हवामान बदलासंबंधातील संयुक्त राष्ट्र अभिसंधी आराखडा |
| ३६६ | UNFPA | संयुक्त राष्ट्रे लोकसंख्या निधी |

| | | |
|---|---|---|
| ३६७ | Unicef | संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय बालकांसाठीचा आकस्मिकता निधी |
| ३६८ | US | अमेरिका |
| ३६९ | USA | अमेरिकेची संयुक्त राज्ये |
| ३७० | USFDA | अमेरिकेचे अन्न व औषध प्रशासन |
| ३७१ | VAT | मूल्यवर्धित कर (व्हॅट) |
| ३७२ | VATI | व्यावसायिक कृषि प्रशिक्षण संस्था |
| ३७३ | VGF | निधीतील तफावत कमी करणे |
| ३७४ | Vidarbha | अमरावती व नागपूर महसूल विभागाअंतर्गत क्षेत्र |
| ३७५ | VIDC | विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ |
| ३७६ | Viz | उदाहरणार्थ, यासारखे करिता वापरले |
| ३७७ | VR | ग्राम मार्ग |
| ३७८ | VRL | लॅटेराइटी, काळी, तांबडी मृदा यांसह अतिवृष्टी क्षेत्र (व्हर्टिसॉल व ऑक्सिसॉल) |
| ३७९ | VRN | अ-लॅटेराइटी मृदेसह अतिवृष्टी क्षेत्र |
| ३८० | VSI | वसंतदादा साखर संस्था |
| ३८१ | VTDC | विदर्भ पर्यटन विकास महामंडळ |
| ३८२ | w.r.t. | - च्या संदर्भात |
| ३८३ | WALMI | जल व भूमि व्यवस्थापन संस्था |
| ३८४ | WCL | वेस्टर्न कोलफिल्ड लि. |
| ३८५ | WHO | जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यू.एच.ओ.) |
| ३८६ | WRD | जलसंपदा विभाग |
| ३८७ | WUA | पाणी वापरकर्ता संस्था |
| ३८८ | YASHADA | यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) |
| ३८९ | YoY | वर्षानुवर्षे |
| ३९० | ZP | जिल्हा परिषद |

# आदरांजली

आमची समिती, आमच्या तीन विख्यात सहकाऱ्यांच्या दु:खद निधनाबद्दल दु:ख व्यक्त करते. डॉ. मुकुंद घारे यांचे दिनांक ११ जानेवारी, २०१२ रोजी दु:खद निधन झाले. डॉ. कुमुद बन्सल दिनांक ५ सप्टेंबर २०१२ रोजी स्वर्गवासी झाल्या आणि जून, २०१३ मध्ये डॉ. आर.पी.कुरुलकर यांचे, ते औरंगबादला असताना हृदयविकाराने निधन झाले.

या सहकाऱ्यांचे आमच्या विचारप्रक्रियेत व दृष्टिकोनात अमूल्य योगदान राहिले आहे. डॉ. घारे हे भूशास्त्र आणि जलसंधारणाच्या क्षेत्रातील तज्ञ होते. त्यांनी राज्याच्या विविध विभागांतील पाणीटंचाईबाबतच्या मुद्यांवर विचारविनिमय करताना उपयुक्त गोष्टी सांगितल्या. दर्जेदार शिक्षण देताना, लोकसंख्याशास्त्र, तफावत आणि विकास यामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना तोंड देणे यावरील डॉ. कुमुद बन्सल यांचे विचार हे समितीच्या दृष्टिकोनाला आकार देण्यामध्ये खूपच मौल्यवान होते. मराठवाडा विकास मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम पाहणारे डॉ. रत्नाकर कुरुलकर यांनी समितीच्या कामकाजात – विशेषत: मराठवाड्याशी संबंधित समस्यांबाबत तसेच समितीच्या एकूण दृष्टिकोनाबाबत – मोलाचे योगदान दिले आहे.

आमच्या या सहकाऱ्यांप्रती आम्ही प्रामाणिक कृतज्ञता व्यक्त करतो.

# ऋणनिर्देश

जलसंपदा, कृषि, उद्योग, पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण, प्रशासन, इत्यादीसारख्या क्षेत्रांतील प्रादेशिक असमतोलाशी निगडित नानाविध समस्यांचा साकल्याने विचार करून हा अहवाल तयार करणे म्हणजे एक आव्हानच होते. तथापि, माननीय मंत्री, लोकप्रतिनिधी, अनेक व्यक्ती, स्वयंसेवी संस्था व महाराष्ट्र शासनाचे अनेक विभाग यांच्याकडून समितीला मिळालेले भरघोस सहकार्य आणि मौलिक माहिती यांमुळे हे आव्हान पेलणे अधिक सुकर झाले.

समिती, माननीय मंत्री, संसद सदस्य, विधानसभा व विधानपरिषद यांचे सदस्य, महापौर व महानगरपालिकांचे सदस्य, जिल्हापरिषदांचे अध्यक्ष व सदस्य, नगरपरिषदांचे अध्यक्ष व सदस्य आणि अन्य सर्व लोकप्रतिनिधी यांनी या कामी दिलेला बहुमोल पाठिंबा व मार्गदर्शन यासाठी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

विविध प्रसंगी ज्यांनी समितीबरोबर माहितीची देवाणघेवाण केली व मौलिक माहिती समितीला पुरवली त्या सर्व तज्ज्ञ व्यक्तींचे, स्वयंसेवी संस्थांचे व अन्य हितचिंतकांचे समिती मन:पूर्वक आभार मानते.

समितीने या संदर्भातील अनेक विषयांचा अभ्यास दुसऱ्यांकडे सोपवला होता. 'Regional Growth Stratagies for Vidarbha/Marathwada/Rest of Maharashtra;' 'A Perspective on Political Dynamics on Maharashtra;' 'Status and Prospects of Investments and Employments in Maharashtra': A Disaggregated Look;' 'New Agricultural Process: Status and Prospects;' 'Lessons to be Learnt from Earlier Policy Attempts and Literature;' 'Strategy Development of Social Sectors as Means of Human Centric Regional Development in Maharashtra;' 'Social Backwardness of Marathwada Region;' 'Health; Thermal Power Plants in Vidarbha and Environmental Impact: The PRAYAS Group, Pune' यांसारख्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी अनेक तज्ज्ञ मंडळीची आम्ही नेमणूक केली होती. हे अभ्यास अनुक्रमे प्रा. प्रदीप आपटे, प्रा. सुहास पळशीकर, डॉ.चंद्रहास देशपांडे, प्रा. माला ललवानी, प्रा. स्वाती शिरवाडकर,डॉ. प्रकाश डोके यांनी पूर्ण केले. सर्व तज्ज्ञ मंडळींनी केलेले तपशीलवार विश्लेषण व समितीला सादर केलेला सर्वसमावेशक अहवाल यासाठी या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो. समिती, डॉ. प्रदीप आपटे यांचे विशेष आभार मानते. त्यांनी केवळ वरील अभ्यास पूर्ण केला एवढेच नव्हे तर, समितीच्या चर्चाविमर्शांमध्ये सहभाग घेतला आणि आमच्या समितीच्या संपूर्ण अहवालाच्या मसुद्याला अंतिम रूप देण्यासाठी अपार मेहनत घेतली. जनजाती क्षेत्रांवरील अभ्यासगटाचे सल्लागार म्हणून डॉ. मिलिंद बोकील यांनी काम पाहिले.

विशेषकरून यात सहभागी झालेल्या व यासाठी आपले योगदान दिलेल्या अभ्यास उपगटांचे विविध तज्ज्ञ व सदस्य यांच्याप्रती समिती आपली कृतज्ञता व्यक्त करते. त्यांची नावे जोडपत्र १.४ मध्ये देण्यात आली आहेत. श्री. सीताराम कुंटे, प्रधान सचिव (नियोजन) यांनी, ते सुरुवातीचे काही महिने सदस्य-सचिव असताना, समितीला अत्यंत मौलिक माहिती दिली, यासाठी समिती त्यांचे विशेष आभार मानते. तसेच आम्ही श्री. सुधीर श्रीवास्तव, प्रधान सचिव (वित्त), श्री. एकनाथ बी. पाटील, प्रधान सचिव (जलसंपदा),श्री. श्यामलकुमार मुखर्जी, सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), श्री. राधेश्याम मोपलवार, सदस्य-सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि श्रीमती एस.एम.अपराजित, संचालक, अर्थ व सांख्यिकी, श्री. पी.एम.कटके, निवृत्त मुख्य अभियंता, वाल्मी (जल व भूव्यवस्थापन संस्था),

औरंगाबाद, श्री. हिंमाशु श्रीमल, अधीक्षक अभियंता व उपसचिव,श्री. एम.एन.डेकाटे, अधीक्षक अभियंता व उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग व श्री. ए.एन.भोसले, सहसचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन या सर्वांचे त्यांनी समितीला उपलब्ध करून दिलेल्या विस्तृत माहितीसाठी आभार मानतो.

आमच्या क्षेत्र भेटी दरम्यान, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व जिल्ह्यांचा अधिकारीवर्ग यांनी केवळ आवश्यक ती सांख्यिकीय माहिती उपलब्ध करून देण्यापुरताच मदतीचा हात पुढे केला नाही तर विभाग व जिल्हे यांची बलस्थाने, न्यूनत्व व तेथे उपलब्ध असलेल्या संधी यांसबंधातील माहिती सादर केली व ती स्पष्ट करूनही सांगितली. यासाठी आम्ही त्यांचे आभार मानतो.

समितीचे सदस्य, राज्याचे संबंधित सर्व विभाग, संचालनालये, आयुक्तालये व क्षेत्रीय कार्यालये यांचे त्यांनी सर्व आधारसामग्री व आवश्यक माहिती पुरविल्याबद्दल आभार मानू इच्छितात. अहवाल तयार करताना विशेषकरून निरनिराळे तक्ते व जोडपत्रे यांची मांडणी करताना बरीचशी माहिती उपलब्ध झाली आहे. श्री. जे.डी.मेहेत्रे, संशोधन अधिकारी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी अहवालाचे प्रारूप तयार करण्यापासूनच या कामासाठी सातत्याने आपला सहयोग दिला. त्यासाठी आम्ही श्री. मेहेत्रे यांचे मन:पूर्वक आभार मानतो. या अहवालाचे मुद्रण होण्यापूर्वी त्याला अंतिम रूप देण्यासाठी सातत्यपूर्वक व अविश्रांतपणे प्रयत्नशील असणारे, महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागातील श्री. एच.व्ही.मालंडकर,उपसचिव, श्री. पी.जी.मेस्त्री, तत्कालीन अवर सचिव, श्री. डी.एन.वेटकोळी, वरिष्ठ स्वीय सहायक, श्री. ए.इ.मते, श्री. रमेश जगताप, व श्री. सुनिल शिंदे हे कक्ष अधिकारी श्रीमती भारती सोनावडेकर, लघुलेखक, श्री. ए.एस.गुसिंगे, सहायक, आणि श्री. मीर आबेद अली, या सर्वांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

सरतेशेवटी, समितीच्या होणाऱ्या बैठकींदरम्यान आणि त्यानंतरही समितीला सातत्याने सहकार्य देणारे डॉ. संजय चहांदे, महासंचालक, यशदा व यशदाचा कर्मचारीवर्ग यांनी दिलेल्या प्रशंसनीय योगदानाबद्दल समिती त्यांचे मन:पूर्वक आभार मानते. श्री. मंदार केळकर, श्रीमती सुजाता अय्यर, श्री. सुमेध गुर्जर व श्री. अजित कर्पे यांनी यासाठी अपार कष्ट घेतले नसते तर समितीसमोर सादर करण्यात आलेल्या सगळ्या माहितीचे संकलन होऊच शकले नसते. समितीच्या कामकाजासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल आम्ही त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. तसेच, आम्ही यशदाला दिलेल्या भेटींदरम्यान आमच्या भोजनाची व निवासाची उत्तम सोय उपलब्ध केल्याने आमचे तेथील वास्तव्य आरामदायी व फलदायी ठरले त्याबद्दल श्रीमती हेमा निंबाळकर, समन्वयक व संचालक, व्यवस्थापन विकास केंद्र, यशदा यांना आम्ही मनापासून धन्यवाद देतो.

सारांश

# प्रमुख निष्कर्ष व शिफारशी

## १. दृष्टिकोन

महाराष्ट्र राज्याच्या रचनेचा इतिहास आणि विद्यमान प्रदेश-विशिष्ट सामाजिक-आर्थिक-राजकीय संयोग विचारात घेता, राज्य शासनाने, माननीय राज्यपालांच्या निदेशांना अनुसरून, दि.३१ मे २०११ रोजी समतोल प्रादेशिक विकास या बाबतीत एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती.

विभिन्न प्रदेशांतील लोकांचे यथार्थदर्शन, उपलब्ध आधारसामुग्रीचे विश्लेषण, अस्तित्वात असलेल्या साहित्यातील कुशल ज्ञान आणि केलेल्या अभ्यासातून प्राप्त झालेले अनुभवाधिष्ठित विश्लेषण तसेच उपगट अहवाल यांवर आमचा दृष्टिकोन आधारित आहे. प्रस्तावित धोरण-उपक्रम हे, साधनसंपत्तीच्या नियतवाटपापुरते मर्यादित नसून ते शासनप्रणित आहेत व उपायात्मक धोरण-सुधारणांवर (strategic policy reforms) आधारित आहेत. (जागतिक व राष्ट्रीय परिवर्तनांमधून घेतलेल्या) महाराष्ट्रातील बदललेल्या प्राचलित पर्यावरणाबद्दलच्या (Parametric environment) आकलनावर, तसेच सद्य राजकीय अर्थशास्त्राच्या निकषांतर्गत मिळवण्यासारख्या बाबींवर आधारित अशा, वास्तववादाच्या निकोप जाणिवेने आम्ही आमच्या शिफारशी ठोसपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आमचा दृष्टिकोन व अगोदरचे दृष्टिकोन यांमध्ये एक महत्वाचा भेद आहे. आतापर्यंतचा दृष्टिकोन हा, प्रत्यक्षातील आवश्यक बाबी व वित्तीय नियतवाटप निव्वळ यांवरच केंद्रित होता. हा दृष्टिकोन निष्फळ व अपर्याप्त असल्याचे सिध्द झाले आहे. तसेच तो निर्विवादपणे 'सर्वांसाठी एकसमान' या तत्त्वालाच चिकटून राहणारा आहे.त्यामध्ये विकासाचे अनेक पैलू व स्रोत, राज्यकारभाराचे मुद्दे, प्रदेशनिहाय पुष्ट्यर्थ धोरणे यांचा पुरेसा विचार करण्यात आला नव्हता. आम्ही फलनिष्पत्तीवर अधिक भर दिलेला असून फलनिष्पत्तीचे संनियत्रण हे मुख्य लक्ष म्हणून सुचविलेले आहे. आम्ही प्रत्यक्षातील आवश्यक बाबी व वित्तीय तरतूद या बाबींचे संबंधित धोरण-साधने म्हणून महत्त्व जाणतो पण त्यांचे अवडंबर करत नाही. आम्ही प्रादेशिक नियोजन व नियतवाटप यांकरिता अनेक धोरणे व नियमन सुधारणा (Governance reforms) तसेच विविध विकेंद्रित व्यवस्था सुचविलेल्या आहेत. त्याचप्रमाणे आम्ही सूत्राधारित नियतवाटप प्रस्तावित केले आहे.

समितीने सर्व महसुली विभागांना भेट देऊन मोठ्या प्रमाणावर बैठकी घेतल्या आहेत. या बैठकींना पालकमंत्री तसेच संसद सदस्य, विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य यांसारखे इतर निवडून आलेले प्रतिनिधी आणि स्थानिक संस्थांचे निवडून आलेले प्रतिनिधी उपस्थित असल्याने आमचा दृष्टिकोन सहभागात्मक आहे. याव्यतिरिक्त महत्वाचे म्हणजे समितीने हितसंबंधित व्यक्तींचे मत अजमावण्याकरिता अनेक स्वयंसेवी संस्था, तज्ञ व सर्वसामान्य जनता यांच्या भेटी घेतल्या. या सर्वांतून आमच्या दृष्टिकोनास आकार देण्यास आम्हाला मदत झाली. तो सारांशरूपाने पुढे मांडला आहे:

## २. निष्कर्ष

सर्व प्रदेशांमध्ये जलद सर्वांगीण विकासाची तीव्र आस असल्याचे (गरीबी कमी करणे व उपजीविकेमध्ये वाढ करणे) स्पष्ट होते; अधिकाधिक विकेंद्रीकरण व प्रादेशिक सक्षमीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे; पाणी हा सर्वत्र जिव्हाळ्याचा मुद्दा असून त्याबाबतच्या गरजा सूक्ष्मभेदासह पूर्ण करणे गरजेचे आहे; जेथे शासनाच्या कृतिशीलतेच्या विश्वसनीयतेचा संबंध आहे तेथे विश्वासाचा अभाव आहे. संपूर्ण प्रदेशांमध्ये भांडवल सुसज्जतेचे स्तर (आणि म्हणून सार्वजनिक खर्च व खाजगी गुंतवणूक/उपक्रम यांच्या कार्यक्षमतेचे स्तर) असमान आहे (अगदी प्रदेशांतर्गत स्तरावर देखील हे खरे आहे) आदिवासी क्षेत्र व पाण्याचे दुर्भिक्ष

असलेले तालुके यांच्याबाबतीत विशेष व ठोस विकासाची आव्हाने समोर आहेत. अशी क्षेत्रे तीनही प्रदेशांमध्ये विखुरलेली आहेत.

या क्षेत्रांकरिता यथोचित धोरण कार्यक्रम आखणे आणि उपाय सुचविणे आम्हाला शक्य व्हावे म्हणून आम्ही त्या क्षेत्रांना कल्पनात्मकतेने “कल्पित क्षेत्रे” (imagined regions) किंवा “वास्तवात्मक क्षेत्रे” (virtual regions) असे म्हटले आहे. एका दृष्टीने आपल्या राज्याला भेडसावणारी महत्त्वाची विकास–आव्हाने पार पाडण्याच्या हेतूने आम्ही आमचा विचारार्थ विषय व्यापक केला आहे.

आवश्यक बाबींवर बेतलेला नव्हे तर फलनिष्पत्तीवर आधारित असलेल्या सध्याच्या प्रादेशिक विकासाचे निर्धारण करण्याचे आम्ही ठरवले आहे. असे करण्याकरिता आम्ही विवक्षित फलनिष्पत्ती निर्धारके (outcome indicators) निश्चित केली आणि शासकीय आधारसामग्रीचा वापर करून प्रादेशिक विकासाचा स्तर व कल निर्धारित केला.

## २.१ उत्पन्न:

प्रादेशिक कलाचा आढावा घेतला असता आम्हाला असे दिसून आले की, प्रदेशा प्रदेशांमध्ये मानव विकास निर्देशांकामध्ये काही प्रमाणात प्रगती झालेली असली तरी आणि प्रादेशिक पातळीवर वाढीचे स्वरूप हे अगदीच असमान नसले तरी, मागील दशकात प्रादेशिक दरडोई उत्पन्न भिन्नतेचे प्रमाण अधिकच चिंताजनक आहे.

कृपया पुढील तक्ता “अ” व “ब” आणि आकृती “अ” व “ब” पहा.

### तक्ता अ : प्रदेशांचे दरडोई उत्पन्न (२००४–०५ स्थिर किंमती)
### (२०११ च्या जनगणनेवर आधारित नवीन मालिका)

(रक्कम रुपयांमध्ये)

| अ. क्र. | प्रदेश | २०००–०१ | २००१–०२ | २००२–०३ | २००३–०४ | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | उर्वरित महाराष्ट्र | २३४५२ | २४७७१ | २६६५२ | २९४९३ | ३२७०४ | ३७४९१ | ४२८४६ | ५०४४७ | ६१७०८ | ६८८१८ |
| २ | मराठवाडा | १५५९५ | १५४९१ | १६११८ | १७४०९ | १८४२९ | १९९३७ | २४०४८ | २७५५२ | ३३६८९ | ४०८२४ |
| ३ | विदर्भ | १९३३६ | १९१४० | २०९१३ | २२२५४ | २४६७३ | २५७४७ | ३०७११ | ३५१३४ | ४२०९३ | ५२२८२ |
| ४ | महाराष्ट्र | २२८०३ | २३०७२ | २४३७० | २६२२० | २९०१५ | ३२१७४ | ३६८८४ | ४२१५१ | ४९६३० | ६०७०८ |

प्रदेशांच्या दरडोई उत्पन्नाच्या अनुषंगाने आम्ही प्रादेशिक तफावतीची गणना केली. तक्ता अ मध्ये प्रदेशाचे दरडोई उत्पन्न स्थिर किंमतीनुसार परिगणित केलेले आहे. तक्ता ब प्रदेशांमधील तुलनात्मक असमानता दर्शवितो. या तक्त्यामध्ये उर्वरित महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नाच्या प्रमाणाच्या तुलनेत मराठवाडा व विदर्भ यांच्या दरडोई उत्पन्नाचे प्रमाण दर्शविलेले आहे. असे दिसून येते की, मराठवाडयाचे दरडोई उत्पन्न हे, उर्वरित महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नाच्या ४०% पेक्षा कमी आहे. तसेच विदर्भाचे दरडोई उत्पन्न हे उर्वरित महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नापेक्षा २७ टक्के कमी आहे.

### तक्ता ब : प्रदेशांच्या दरडोई उत्पन्नाचे प्रमाण
### (उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा व विदर्भ)

| अ. क्र. | प्रदेश | २०००–०१ | २००१–०२ | २००२–०३ | २००३–०४ | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | उर्वरित महाराष्ट्र | १.०० | १.०० | १.०० | १.०० | १.०० | १.०० | १.०० | १.०० | १.०० | १.०० |
| २ | मराठवाडा | ०.६६ | ०.६३ | ०.६० | ०.५९ | ०.५६ | ०.५३ | ०.५६ | ०.५५ | ०.५५ | ०.५९ |
| ३ | विदर्भ | ०.८२ | ०.७७ | ०.७८ | ०.७५ | ०.७५ | ०.६९ | ०.७२ | ०.७० | ०.६८ | ०.७६ |

हे प्रमाण मराठवाडा व विदर्भामध्ये गेल्या १० वर्षांमध्ये क्रमश: घसरत गेलेले आहे. पूर्वीची तफावत (०.६६ व ०.८२) अधिकच वाढत जाऊन अनुक्रमे ०.०७ व ०.०६ एवढी झाली.

१९९३-९४ ते २००९-१० या काळातील उपलब्ध आधारसामग्रीवरून असे दिसून येते की, दरडोई उत्पन्नातील प्रादेशिक तफावतींमध्ये विशेष लक्षणीय बदल झालेला आहे. १९९३-९४ ते १९९९-२००० या वर्षांमध्ये जिल्हास्तरीय दरडोई उत्पन्नातील तफावत हळूहळू कमी (दुसऱ्या शब्दांत संयतपणे विकासाभिमुख) होत गेल्याचे आम्हास दिसते. असे असले तरी, नंतरच्या २०००-०१ पासून २००९-१० पर्यंतच्या कालावधीत हा कल उलट रीतीने जात असल्याचे दिसते. विदर्भातील कृषि क्षेत्राला सामोरे जावे लागलेल्या नकारात्मक आघातांमध्ये यामुळे मोठया प्रमाणावर भर पडली. त्याचा तपशील आकृती **अ** व **ब** मध्ये सोदाहरण दिलेला आहे.

संघराज्यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवाच्या तसेच भारतीय राज्यांच्या अनुभवाच्या चष्म्यातून पाहिले असता, ही प्रादेशिक असमानता किंवा असमतोल खूप मोठा नाही असे दिसेल.शिवाय प्रादेशिक मानव विकास निर्देशांकामधील वाजवी विकासाभिमुखतेमुळे देखील हितसंबंधित व्यक्तींमधील चिंतातुरतेची- जी अगदी उघड आहे- कारणे शोधणे आम्हाला भाग पडले. याची मुख्य कारणे ही, कृषि किंवा आदिवासी क्षेत्र विरुद्ध उद्योगप्रधान व शहरी वसाहती यांमधील मुळातच असलेल्या तफावतींशी - ज्या गेल्या पंधरा वर्षांत अधिक उपक्रमांच्या संरचनेतील बदलामुळे व युती सरकारांमधील राजकीय सत्तेतील प्रादेशिक स्थित्यंतरामुळे आणखी वाढत गेलेल्या आहेत- संबंधित आहे, असे आम्हास वाटते.

ह्या कारणांमध्ये पुढील, बाबी समाविष्ट आहेत: (१) मुख्यत्वेकरून विदर्भातील विशेषत: अमरावती विभागातील कृषि उत्पन्नामधील नकारात्मक वाढ सिंचनातील अपुरा विस्तार हा अंशत: कारणीभूत आहे. (२) मुख्यत: मुंबई-ठाणे-नाशिक-पुणे क्षेत्रांमध्येच नव्हे तर काही प्रमाणात औरंगाबाद व नागपूर जिल्ह्यांमध्ये असलेल्या उद्योगांचा व माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा शीघ्र आर्थिक विकास. (३) राजकीय सत्तेच्या प्रांगणात सबळ किंवा साधनसंपत्तीयुक्त विभागांचा भार तुलनेने उर्वरित महाराष्ट्राकडे व काही प्रमाणात मराठवाडयाकडे एकवटलेला होता.

### आकृती अ : प्रारंभिक दरडोई उत्पन्न व दरडोई उत्पन्नाच्या वाढीचा दर (१९९३-९४ ते १९९९-२०००)



**आकृती ब : प्रारंभिक दरडोई उत्पन्न व दरडोई उत्पन्नाच्या वाढीचा दर (२०००–२००१ ते २००९–२०१०)**




## २.२ सिंचन

१९८२–२०१० या प्रदीर्घ कालखंडामध्ये, उर्वरित महाराष्ट्रातील पुणे विभागामध्ये जलद प्रमाणात सिंचनात वाढ झाली आहे, पण विशेषकरून अमरावती विभागात तसेच औरंगाबाद व कोकण विभागांमध्ये सिंचनात तूट राहिली. **आकृती क** मध्ये असे दिसते की, १९६० ते ८२ या काळातील ओलिताखालील जमिनीचा वार्षिक वाढीचा दर हा जवळपास सारखा होता. तेव्हापासून तो उर्वरित महाराष्ट्राच्या विभागांमध्ये दोन दशकांहून अधिक काळ उच्चतर राहिलेला आहे, परंतु अलिकडच्या वर्षांमध्ये वाढीच्या दरातील तफावत कमी झालेली आहे.

**आकृती क: सिंचित क्षेत्रामधील वाढीचा वार्षिक दर (१९६०–२०१०)**

(वाढीचा दर टक्क्यांमध्ये)



अशाप्रकारे, आम्ही विशिष्ट नेमक्या क्षेत्रांतील (संरचनात्मक, आर्थिक व राजकीय) याबाबतच्या कारणांचा शोध घेतलेला आहे आणि चौदाव्या योजनेच्या अखेरीपर्यंत दरडोई उत्पन्नातील या तुटी एक तृतीयांशाने कमी करण्यावर आमच्या उपायात्मक शिफारशी आधारित ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. जेथे अशा तफावती (आर्थिक व विकासात्मक ) तीव्र स्वरुपाच्या आहेत अशा, आदिवासी क्षेत्रे व पाण्याची गंभीर समस्या असलेले तालुके यांसारख्या काही विशिष्ट बाबतीत हे उद्दिष्ट आणखी लवकर गाठणे गरजेचे आहे.

## २.३ क्षेत्रीय फलनिष्पत्ती निर्देशांक

**इतर ५ क्षेत्रीय फलनिष्पत्ती निर्देशांकां**वरून गणना केली असता तीन प्रदेशांतील प्रमाणानुसार विकास तूट ही, विदर्भ ३९ टक्के, मराठवाडा ३७ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्र २४ टक्के अशी होती.

**तक्ता क: विकासातील तफावत (प्रमाण)**

| प्राचले (Parameters) | भार (Weights) | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| संपर्क जाळे | ०.२० | ०.४३ | ०.३१ | ०.२६ |
| शिक्षण व कौशल्य विकास | ०.२० | ०.३६ | ०.३८ | ०.२५ |
| आरोग्य | ०.२० | ०.४१ | ०.३६ | ०.२३ |
| कर्ज उपलब्धता | ०.२० | ०.३६ | ०.३७ | ०.२७ |
| वीज | ०.२० | ०.३८ | ०.४३ | ०.१९ |
| विकासातील तफावत | १.०० | ०.३९ | ०.३७ | ०.२४ |

## ३. कार्यतंत्र (Strategy)

प्रादेशिक असमतोलाबाबतच्या आमच्या दृष्टिकोनाच्या दोन विचारधारा आहेत. यांपैकी प्रत्येक विचारधारेला मार्गदर्शक व संस्थात्मक सुधारणा यांसह अनेकविध घटक व परिमाणे आहेत. पहिल्या विचारधारेमध्ये 'प्रमाणक तत्वावर' विशेष निर्देशित सार्वजनिक वस्तूंची समान उपलब्धता व उपयोग करण्याची संधी या बाबी अंतर्भूत आहेत. अशा समानीकरणामुळे प्रदेशांमध्ये किमान विकासात्मक तुल्यता सुनिश्चित होईल. दुसऱ्या विचारधारेमध्ये संबंधित पायाभूत सुविधांचा विकास करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक साधनसंपत्तीचे समन्यायी नियतवाटप करून त्यामार्फत प्रादेशिक आर्थिक वृध्दीला गती देण्याचे स्पष्ट केले आहे. अशा पायाभूत सुविधांच्या सशक्तीकरणामुळे अधिक खाजगी गुंतवणुकीला चालना मिळेल, आणि अधिक आर्थिक प्रगती शक्य होईल. प्रदेशाप्रदेशांमध्ये विकासाची क्षमता व तौलनिक उपयोग याबाबी भिन्न असल्यामुळे पायाभूत सुविधांच्या प्रोत्साहनांचे संबद्ध घटकही प्रदेशाप्रदेशांमध्ये वेगळे असतील. याविषयी समिती, ज्यांमुळे प्रादेशिक तफावती अधिक शीघ्रतेने दूर करण्याची खात्री होईल असे, सरकारी धोरणांचे एकाच वेळी वापरता येतील असे दोन मार्ग प्रस्तावित करते. पहिला म्हणजे महत्वाच्या सार्वजनिक वस्तूंचा उपयोग करण्याची समान संधी आणि दुसरा म्हणजे (एक) सुधारित प्रोत्साहक पायाभूत सुविधा, (दोन) प्रदेशांना ज्या क्षेत्रांचा गतिमान तौलनिक उपयोग होईल अशी क्षेत्रे वाढविणे आणि (तीन) खाजगी गुंतवणुकीला चालना देण्याकरिता यथायोग्य प्रेरक उद्दिष्टे व धोरणे- यांमार्फत वाढीचा वेग वाढविण्याबाबतची कार्यतंत्रे, हे आहेत. समितीने शिफारस केलेल्या अशा दृष्टिकोनामुळे तत्त्वत: सर्व प्रदेशांमध्ये उपलब्धता व उपयोग संधी यांचे समानीकरण होईल. आम्ही शिफारस केलेल्या, बहुविध परिमाणे असलेल्या कृति-आराखड्यामुळे उत्पन्नातील तफावत कमी होईल व मागे पडलेल्या प्रदेशांच्या विकासाला योजनाबध्द रीतीने चालना मिळेल. याशिवाय, आदिवासी क्षेत्रांच्या व पाण्याची गंभीर समस्या असलेल्या तालुक्यांच्या विशेष व तातडीच्या गरजा निश्चित करताना, आम्ही, या क्षेत्रांना "वास्तवात्मक" अथवा "कल्पित" प्रदेश म्हणून मान्यता देऊन प्रदेशाची संकल्पना मांडलेली आहे आणि धोरण उपक्रमांचा एक वास्तवस्पर्शी संच प्रस्तावित केला आहे. आरोग्य व शिक्षण तसेच कौशल्य विकास या क्षेत्रांबाबत आम्ही विद्यमान राष्ट्रीय धोरणांमध्ये अंतर्भूत असलेल्यांहून उच्चतर प्रमाणके व मानके प्रस्तावित केली आहेत.

## ४. प्रादेशिक विकास धोरण

समतोल प्रादेशिक विकास साधण्याकरिता विदर्भ आणि मराठवाडा यांसारख्या मागे पडलेल्या प्रदेशांचा विकास गतिमान करण्याबरोबरच किमानपक्षी उर्वरित महाराष्ट्राच्या विकासाचा आलेख राखावयास हवा. अपुऱ्या आणि अस्थिर अभिवृध्दी दरांमुळे, उत्पन्नातील अगोदरच्या तफावती त्याच तीव्रतेने कायम राहतात हे स्पष्ट अनुमान आहे. या अहवालात विचार करण्यात आलेल्या विकासाच्या धोरणामध्ये, प्रदेशांची साधनसंपत्तीवर आधारित प्रतिमा विचारात घेतलेली असून गतिमान शाश्वत विकासाचे ध्येय ठेवलेले आहे. प्रदेशांना लाभलेली साधनसंपत्तीची देणगी, स्थानानुसार मिळणारे लाभ, इत्यादींतून अपेक्षित असलेला गतिमान तौलनिक उपयोग विचारात घेऊन आखलेली प्रदेश–विशिष्ट विकास धोरणे असणे आपणासाठी गरजेचे आहे. आम्ही अशा प्रत्येक प्रदेशाकरिता अशी विशिष्ट क्षेत्रे निश्चित केलेली असून खाजगी गुंतवणुकीचा ओघ वाढावा त्याचबरोबर विद्यमान धोरणांमधील अडथळे दूर व्हावेत याकरिता आवश्यक त्या धोरण–सुधारणा सुचविलेल्या आहेत. हे करताना आम्ही "सर्वांसाठी एकसमान" हे तत्त्व कटाक्षाने दूर ठेवले आहे.

धोरण–सुधारणांची अंमलबजावणी ही, विकास गतिमान करण्यामध्ये महत्त्वाची ठरते. बाह्यता व आधिक्य परिणाम दूर करतील अशा, कौशल्यविकास, सुशासन, उद्योगधंदा करण्यातील खर्च कमी करणे व 'भरभक्कम विकास' भांडवल "(Big push Development capital)" या बाबी नेटाने अंमलात आणल्या पाहिजेत. सार्वजनिक–खाजगी क्षेत्रातील अधिकाधिक साधनसंपत्तीचा ओघ व आवश्यक त्या धोरण– नियमन सुधारणा (governance reforms) यांबरोबरच विकास धोरणाद्वारे कृषि क्षेत्रातील पिछेहाट तसेच विदर्भाच्या शोषित क्षमता या बाबीं तातडीने निकालात काढणे गरजेचे असेल. मोठया व लहान बंदरांचा विकास तसेच किनाऱ्यावरील जहाजी माल व प्रवासी यांची अधिकाधिक वाहतूक यांमुळे कोकण पर्यटनाला व त्याच्या वाणिज्यिक क्षमतेला उत्तेजन मिळेल. भविष्यातील विकासाचे कल गृहित धरून, राज्य धोरणामध्ये रेल्वे व रस्ते जोडणी, हवाईमार्ग जोडणी आणि प्रत्येक जिल्ह्यात एक विमानतळ या बाबींचे ध्येय ठेवायला हवे व त्याबाबतीत योजना करावयास हवी.

## ५. चौदाव्या योजना कालावधीच्या अखेरीपर्यंतचे (२०२७ पर्यंत) वित्तीय साधनसंपत्ती अंदाज

आम्ही चौदाव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीच्या अखेरीपर्यंतचे राज्याच्या योजना साधनसंपत्तीचे नेमस्त अंदाज काढलेले आहेत. आम्हाला असा विश्वास आहे की, पुढील १३ वर्षांमधील एकूण साधनसंपत्ती ही, चौदाव्या योजनेच्या अखेरीपर्यंत चालू दरांनी रु.२३ ते २४ लाख कोटी एवढी असेल. त्याच वेळेस, या अहवालामध्ये विचारात घेतलेल्या विविध क्षेत्रांना निधीची आवश्यकता व राज्याला ज्यांकरिता तरतूद करावयाची आहे अशा इतर क्षेत्रांची आवश्यकता (या प्रकरणामध्ये पुढे स्पष्ट केलेला अविभाज्य योजना निधी) एकत्र मिळून चालू दरांनी रुपये १४ ते १६ लाख कोटी एवढी असेल. अविभाज्य निधीअंतर्गत येणाऱ्या क्षेत्रांच्या खर्चाचा विद्यमान अभिवृध्दी दर आणि भारतीय रिझर्व्ह बँक व केंद्रीय वित्त आयोग जो बहुतेक करून स्वीकारतात तो दर साल ५ टक्के हा चलनवाढीचा दर हे विचारात घेऊन हा अंदाज काढण्यात आला आहे. अशाप्रकारे १४ व्या योजनेच्या अखेरीपर्यंत अंदाजित साधनसंपत्ती आणि अंदाजित निधी यांमध्ये मेळ घालण्यास पुरेसा वाव आहे, हे स्पष्ट होते. म्हणून या अहवालातील आमच्या शिफारशी या पूर्णत: अंमलबजावणीयोग्य आहेत. पुढे समितीच्या प्रमुख शिफारशी दिलेल्या आहेत.

## ६. शिफारशी

### ६.१ योजनांतर्गत साधनसंपत्तीचे प्रादेशिक नियतवाटप

१. (अनुसूचित जाती उपयोजना/जनजाती उपयोजना यांसाठी वजा केल्यानंतर) योजनांतर्गत साधनसंपत्तीची सर्वप्रथम सर्वसाधारण क्षेत्र व जल क्षेत्र यांमध्ये ७०:३० प्रमाणात विभागणी करण्यात यावी.

२. आम्ही केवळ आठ वर्षांच्या पहिल्या टप्प्याकरिताच जल क्षेत्र तुटींचा व तरतुदींचा तात्पुरता अंदाज दिलेला आहे.

३. वरीलप्रमाणे जल क्षेत्राच्या करण्यात येणाऱ्या नियतवाटपामध्ये, शिफारस करण्यात आलेले पाण्याची गंभीर समस्या असलेले चव्वेचाळीस तालुके, भूस्तर प्रतिकूल असलेले पंच्याऐंशी तालुके, खार पाण पट्टा व माजी मालगुजारी तलाव अशा गंभीर समस्येच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण चार क्षेत्रांकरिता नियतवाटप करण्यास प्राधान्य देण्यात यावे.

४. पाण्याची गंभीर समस्या असलेल्या तालुक्यांकरिता (४४) रु. १७९८ कोटी; भूस्तर प्रतिकूल तालुक्यांकरिता (८५) रु. १७३२ कोटी; माजी मालगुजारी तलावांकरिता रुपये २५२० कोटी आणि खार पाण पट्ट्याकरिता रु. ५४२ कोटी या प्रमाणे वरील प्रत्येक प्राथम्य क्षेत्रांसाठी, मर्यादित कालावधीकरिता स्वतंत्र निश्चित एकूण नियतवाटपाची पुढीलप्रमाणे शिफारस केलेली आहे. या समस्यांवरील उपाय म्हणून अनुक्रमे २७.३ टक्के, २६.३ टक्के, ३८.२ टक्के आणि ८.२ टक्के ही त्यांची तुलनात्मक टक्केवारी नियतवाटपाच्या या मर्यादित अवधीमध्ये सतत राखली गेली पाहिजे.

५. या क्षेत्रांना नियतवाटप केल्यानंतर, उर्वरित जलक्षेत्रांचे नियतवाटप हे, पुढील परिच्छेद ६ मध्ये दाखविल्याप्रमाणे, शिफारस केलेल्या प्रमाणानुसार जल स्रोत (भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील), लाभक्षेत्र विकास, जल संधारण (पाणलोट क्षेत्र) आणि पेयजल व स्वच्छता यांसारख्या सर्व जल संबंधित क्षेत्रांकरिता उपलब्ध करण्यात यावे.

६. पुढील तक्ता "ड" मध्ये दाखविल्याप्रमाणे विदर्भाकरिता ३५.२६ टक्के, मराठवाड्याकरिता २१.५९ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्राकरिता ४३.१५ टक्के अशी टक्केवारी असावयास हवी.

**तक्ता ड : एकूण जल तुटीकरिता वाटप (टक्के)**

| प्रदेश | भार | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| पेयजल तूट | ५० | २२.३९ | २३.०१ | ५४.६० |
| विकास तूट | ५० | ४८.१३ | २०.१६ | ३१.७१ |
| एकूण टक्केवारी | १०० | ३५.२६ | २१.५९ | ४३.१५ |

७. प्रत्येक प्रदेशाने, उर्वरित जल क्षेत्र नियतवाटपांपैकी जलस्रोत विकासाकरिता (भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील) (५०टक्के), लाभक्षेत्र विकासाकरिता (८ टक्के), जलसंधारणाकरिता (पाणलोट क्षेत्र) (१० टक्के) आणि पेयजल व स्वच्छता यांकरिता (१२ टक्के) असे नियतवाटपाच्या निर्धारित स्तरांचे अनुपालन केले पाहिजे.

८. वरील परिच्छेद ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निर्धारित स्तरांवरील नियतवाटप केल्यानंतर, प्रादेशिक पातळीवर उपलब्ध असलेल्या पाण्यासाठीच्या उर्वरित निधीचे वरील परिच्छेद ३ ते ५ मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही क्षेत्रासाठी नियतवाटप करण्यात यावे.

९. अनुसूचित जाती उपयोजना/जनजाती उपयोजना / जल याबाबतच्या तरतुदी वजा केल्यानंतर, राज्य पातळीवर उपलब्ध सर्वसाधारण क्षेत्र साधनसंपत्ती संकोषाची सामान्यत: ६०:४० या प्रमाणात विभाज्य व अविभाज्य घटकांमध्ये आणखी विभागणी करावयास हवी. यामधील ६० टक्के विभाज्य निधी हा, आमच्या शिफारशीनुसार नियतवाटपाकरिता आधारभूत अथवा निर्धारित स्तर म्हणून समजण्यात यावा.

१०. उपरोक्त प्रमाणे साधनसंपत्तीचा विभाज्य व अविभाज्य संकोष निर्माण करण्यात यावा आणि विभाज्य साधनसंपत्ती संकोष म्हणून वेगळी ठेवलेली साधनसंपत्ती ही, "एकूण विकास तूट" म्हणून असलेल्या तीन प्रदेशांमध्ये समितीच्या सूत्रानुसार वितरित करण्यात यावी. ही साधनसंपत्ती प्रादेशिक मंडळांच्या ताब्यात ठेवण्यात यावी.

समितीच्या सूत्रानुसार विभाज्य संकोषाची तीन प्रदेशांमध्ये आणखी विभागणी करावी. त्याचे प्रमाण पुढील तक्ता "**ई**" मध्ये दिल्यानुसार असावे.

**तक्ता ई : मुंबई वगळता एकूण टक्केवारी (जल क्षेत्राव्यतिरिक्त )**

| प्राचले | भार | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| लोकसंख्या | ४५ | २३.०३ | १८.७४ | ५८.२३ |
| विकासातील तफावत | २५ | ३८.८३ | ३७.२५ | २३.९२ |
| दरडोई उत्पन्न | २० | ३७.६७ | ४३.२८ | १९.०५ |
| क्षेत्र | १० | ३१.७२ | २१.१० | ४७.१८ |
| एकूण टक्केवारी | १०० | ३०.७८ | २८.५१ | ४०.७१ |

११. विभाज्य संकोषाला (आधारभूत ६० टक्के) लागू असलेले नियतवाटप सूत्र आणि जल क्षेत्राकरितांचे नियतवाटप एकत्र केल्यावर, अनुच्छेद ३७१ (२) अन्वये योजना साधनसंपत्तीतून प्रादेशिक नियतवाटपांचे एकूण प्रमाण मिळेल आणि अशाप्रकारे पुढील तक्ता फ मध्ये दिल्याप्रमाणे तीन प्रदेशांसाठींच्या आमच्या सूत्रानुसार नियतवाटपाच्या शिफारशींचे एकत्रीकरण होईल.

**तक्ता फ : (मुंबई वगळता) एकूण प्रादेशिक नियतवाटपाची टक्केवारी**

(टक्केवारीत)

| प्राचले | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| एकूण टक्केवारी | ३३.२४ | २५.३१ | ४१.४५ |

१२. प्रस्तावित प्रादेशिक विकास योजना यशस्वीपणे राबविण्यात येत असल्याची खात्री करण्यासाठी हेतूने सर्व प्रदेशांमध्ये योजनेतर विकास साधनसंपत्तीची पर्याप्त प्रमाणात तरतूद करण्यात आली आहे हे पाहण्याची दक्षता घेतली पाहिजे.

१३. समितीने सुचविल्याप्रमाणे प्रादेशिक पातळयांवरील साधनसंपत्तीची प्रादेशिक, जिल्हा व गट पातळ्यांवर आणखी विभागणी केली पाहिजे. राज्यामध्ये, राज्यस्तरीय योजना, प्रदेशस्तरीय योजना, जिल्हास्तरीय योजना आणि गटस्तरीय योजना असे योजनांचे चार स्तर असावेत.

१४. विभाज्य साधनसंपत्तीच्या प्रादेशिक संकोषापैकी जिल्हा नियोजन समित्यांना (३० टक्के निर्धारित स्तरावर) व गटांना (३० टक्के निर्धारित स्तरावर) समितीच्या नियतवाटपाच्या सूत्राचा वापर करून, प्रादेशिक विकास मंडळांकडून नियतवाटप करण्यात यावे.

१५. प्रादेशिक स्तरावर उपलब्ध असलेली उर्वरित विभाज्य साधनसंपत्ती ही, विविध जिल्हा नियोजन समित्यांना किंवा विविध गटांना किंवा विविध क्षेत्रांना आणि प्रादेशिक प्राथम्यानुसार प्रकल्पांना/ योजनांना वितरित करण्यात यावी.

१६. निर्धारित स्तरावरील क्षेत्रीय नियतवाटपाकरिता, जसे "वाहतूक मार्गांचे जाळे (रस्ते, रेल्वे, बंदरे व हवाईमार्ग)", कृषी व संलग्न सेवा (कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय आणि सहकार यांसह), वीज,

सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण (प्राथमिक, माध्यमिक, उच्च व तंत्र आणि वैद्यकीय) यांना विभाज्य राज्य सर्वसाधारण योजनेच्या अनुक्रमे २० टक्के, १५ टक्के, ८ टक्के, ११ टक्के व ११ टक्के या प्रमाणात नियतवाटप करण्यात यावे, अशीही शिफारस करण्यात आली आहे. प्रादेशिक विकास मंडळांनी प्रादेशिक स्तरावर क्षेत्रीय टक्केवारीचे अनुपालन करावे.

## ६.२ सुशासन : महत्तम प्रादेशिक सक्षमीकरण आणि उत्तरदायित्वे

१७. अध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री आणि कार्यकारी अध्यक्ष म्हणून त्या प्रदेशातील ज्येष्ठतम मंत्री तसेच उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री, राज्य नियोजन मंडळाचा कार्यकारी अध्यक्ष, त्या प्रदेशातील सर्व मंत्री, दोन विधानसभा सदस्य, दोन विधानपरिषद सदस्य, महानगरपालिकांचे दोन महापौर, नगरपरिषदांचे दोन अध्यक्ष, जिल्हा परिषदांचे दोन अध्यक्ष, त्या प्रदेशातील दोन सन्मान्य नागरिक आणि दोन तज्ज्ञ यांचा अंतर्भाव असलेल्या प्रादेशिक विकास मंडळाची पुनर्रचना करून ती कार्यक्षम करावी.

१८. अपर मुख्यसचिव आणि प्रादेशिक विकास आयुक्त हे सदस्यसचिव असावेत.

१९. प्रादेशिक मंडळांनी त्या प्रदेशाच्या, व्यापक पंचवार्षिक यथार्थदर्शी योजना व वार्षिक योजना तयार कराव्यात. समितीने सुचविलेल्या सूत्रानुसार योजनांतर्गत साधनसंपत्ती जिल्हे व गट यांच्याकडे असावी.

२०. प्रादेशिक मंडळांकडे त्या प्रदेशाच्या विकास आराखड्याचे नियोजन, पर्यवेक्षण व संनियंत्रण यांची जबाबदारी सोपविण्यात यावी.

२१. योजनांतर्गत कार्यान्वयनामधील प्रदेश-विशिष्ट समस्यांवर जलद निर्णय घेण्याकरिता कार्यकारी अध्यक्षाच्या नियंत्रणाखाली प्रत्येक प्रदेशामध्ये अधिकारप्रदत्त मंत्रिगट स्थापन करण्यात यावा.

२२. अपर मुख्य सचिव आणि प्रादेशिक विकास आयुक्त म्हणून पदनिर्देशित केलेला अपर मुख्य सचिव दर्जाचा अधिकारी हा प्रादेशिक सचिवालयाचा प्रमुख असावा आणि प्रादेशिक विकास मंडळाचा सदस्य-सचिव असावा.

२३. नागपूर करारातील प्रमुख बाबींना चालना देण्यासाठी महत्वाच्या मंत्रालयीन विभागांची तीनही प्रदेशांमध्ये समन्यायी विभागणी व्हावी.

२४. गट नियोजन समित्या स्थापन करण्यात याव्यात.

२५. राज्याच्या सार्वजनिक खाजगी सहभाग असलेल्या मोठ्या प्रकल्पांच्या व्यवस्थापनाकरिता तसेच प्रकल्प-विशिष्ट कर्जाऊ रकमांच्या व्यवस्थापनाकरिता राज्य शासनाने प्रकल्प मूल्यन मंडळ स्थापन करावे.

२६. राज्यातील सांख्यिकी यंत्रणा बळकट करण्याकरिता, राज्य सांख्यिकी मंडळ हे नवीन अभिकरण लवकरात लवकर स्थापन करण्यात यावे.

२७. धोरण संस्था या स्वरूपात नवीन सार्वजनिक धोरण व्यासपीठे तसेच राज्य स्तरावर महाराष्ट्र विकास संशोधन परिषद आणि प्रादेशिक स्तरांवर प्रादेशिक शासन संस्था स्थापन करण्यात याव्यात.

२८. प्रत्येक वर्षाच्या १ ते ३१ डिसेंबर या निर्धारित काळाकरिता मंत्रालय नागपूर येथे स्थलांतरित करावे.

२९. नागपूर कराराच्या पालनाच्या अनुषंगाने अनेक संचालनालये नागपूर व औरंगाबाद येथे स्थलांतरित करण्यात यावीत.

३०. सध्या विदर्भामधील वनांद्वारे देण्यात येणाऱ्या पर्यावरणीय सेवांना भारत सरकारकडून "हरित बोनस" (Green

Bonus) देऊन बक्षीस देण्यात येते. तथापि, ते महाराष्ट्राच्या आकस्मिकता निधीचा एक भाग आहे. हा बोनस, प्रादेशिक विकास मंडळासाठी देण्यात येणाऱ्या निधीच्या जोडीनेच वन क्षेत्रांच्या प्रमाणात जिल्हयांचा विकास करण्यासाठीच निर्बंधित (ring-fenced) असावा, अशी आम्ही शिफारस करतो.

३१. विदर्भाच्या खनिज संपत्तीमधून मिळणारे स्वामित्वधन हे स्थानिक क्षेत्र विकासासाठी क्षेत्र विकासासाठीच निर्बंधित (Ring fenced) असावे. त्याचप्रमाणे, स्वामित्वधन हे सरसकट मूल्यानुसार ठरविण्यात यावे आणि ठराविक कालावधी नंतर त्यात सुधारणा करण्यात यावी.

३२. प्रदेशात निर्माण होणारी वीज ही स्थानिक ठिकाणी कमी दराने उपलब्ध करून देण्यात यावी. त्याचप्रमाणे, इतर प्रदेशांना निर्यात होणाऱ्या विजेपासून मिळणारा महसुलाचा काही भाग पुनर्वसन, प्रदूषण नियंत्रण व स्थानिक विकास याकरिता वापरण्यात यावा.

## ६.३ आदिवासी क्षेत्रे: वचनपूर्ती

३३. जनजाति सल्लागार परिषदेस "जनजाति सल्लागार व विकास परिषद" बनवून, तिची व्याप्ती व जबाबदारी अधिक व्यवस्था करण्यात यावी. राज्याची संपूर्ण जनजाति विकास योजना व तिचा नियत खर्च हा, राज्य विधानमंडळासमोर सादर करण्यापूर्वी, जनजाति सल्लागार परिषदेकडून मंजूर करून घेण्यात यावा आणि त्यावर जनजाति सल्लागार परिषदेचे संनियंत्रण असावे.

३४. जनजाति उप योजनेचा निधी, नियमित सर्वसाधारण योजनांशिवाय जनजातीच्या विशिष्ट योजना अधिक विकसित करण्यासाठी "अतिरिक्त तत्त्वांसह" उपलब्ध करून देण्यात यावा व वापरण्यात यावा. जनजाति क्षेत्र योजनेचा निधी सर्वसाधारण योजना व योजनेतर सर्वसाधारण खर्च यांच्याऐवजी किंवा त्यांचा पर्याय म्हणून वापरण्यात येऊ नये.

३५. महाराष्ट्र शासनाने, जनजाति क्षेत्र उपयोजनेचा निधी व्यपगत होणार नाही किंवा इतर प्रयोजनांकडे वळविता येणार नाही असे कायद्याद्वारे अनिवार्य करावे.

३६. जनजाति क्षेत्र उपयोजनेच्या निधीच्या मर्यादा व नियतवाटप पुढील रीतीप्रमाणे असावे: ग्रामसभा ५० टक्के; ग्रामपंचायत १५टक्के; पंचायत समिती १५टक्के; जिल्हास्तर १० टक्के आणि राज्य स्तर १० टक्के.

३७. केवळ बहुसंख्येने आदिवासी लोकसंख्या असलेले असे एकूण आठ जिल्हे व शंभर तालुके निर्माण करण्यात यावेत. ही प्रशासकीय युनिटे सर्वसाधारणपणे अनुसूचित क्षेत्राशी जोडली जावीत.

३८. मार्च, २०१३ मध्ये केंद्र सरकारने दिलेल्या सूचनांचे अनुपालन करतांना शासनाने विशेष आयोग स्थापन करून आदिवासी लोकांकरिता असणाऱ्या जमीनविषयक सर्व सुधारणा व जमिनीचे वाटप या कार्यक्रमाची तातडीने अंमलबजावणी करावी.

३९. एक अत्यंत तातडीचा कालबध्द कार्यक्रम राबवून अन्यसंक्रामित आदिवासी जमिनी आदिवासींना परत करण्यात याव्यात व भविष्यात आदिवासींच्या जमिनी अन्यसंक्रामित करण्यासाठी परवानगी देऊ नये. या प्रयोजनार्थ, आदिवासी जमातीमध्ये क्षमता निर्माण करणे यांसह केंद्र सरकारने मान्यता दिल्याप्रमाणे अनुसूचित क्षेत्रांसाठी पंचायत विस्तार व वन हक्क अधिनियमाची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी.

४०. १३ व्या वित्त आयोगाने ईशान्येकडील राज्यांकरिता सुचविलेल्या शिफारशींच्या धर्तीवर, ज्या अनुसूचित क्षेत्रांनी, वन साधनसंपत्तीचे संवर्धन केले आहे अशा अनुसूचित क्षेत्रांना हरित बोनस (Green Bonus) मंजूर करण्यात यावा.

४१. दोन दशलक्ष आदिवासी तरुणांमध्ये स्वयं-रोजगाराची क्षमता निर्माण करण्यासाठी पुढील दहा वर्षांकरिता प्रतिवर्षी दोन लाख आदिवासी तरुणांसाठी, शैक्षणिक व व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर एक कार्यक्रम हाती घेण्यात यावा.

४२. राज्यात दोन जनजाति विद्यापीठे असावीत. (त्यापैकी गडचिरोलीमधील गोंडवन विद्यापीठ हे एक जनजाति विद्यापीठ असेल तर दुसरे नवीन विद्यापीठ ठाणे-नाशिक प्रदेशामध्ये स्थापन करण्यात यावे).

४३. विधानमंडळाची "अनुसूचित जनजाति कल्याण समिती" पुनर्घटित करण्यात यावी आणि तिला "स्थायी समिती" चा दर्जा देण्यात यावा.

४४. जनजाति विकास निर्देशांक हा वार्षिक आधारावर संनियंत्रित करण्यात यावा.

४५. आश्रमशाळेतील शिक्षणाचा अभ्यासक्रम व दर्जा आणि आश्रमशाळेची स्थिती परिणामकारकपणे सुधारण्यात आलीच पाहिजेत.

४६. आदिवासी मुलांच्या शिक्षणाचे माध्यम हे सुरुवातीला मातृभाषा असावे. तिसऱ्या इयत्तेपासून पुढे इतर भाषांचा परिचय करून देण्यात यावा.

४७. सर्व आदिवासी लोकांना आरोग्याची काळजी घेण्याबाबतचा एक योग्य व सहजसोपी पद्धत उपलब्ध करून देण्यात यावी आणि एकात्मीक बालविकास योजना कार्यक्रमामधील दर दिवशीच्या खर्चानुसार पोषणआहाराविषयक अर्थसंकल्पात वाढ करण्यात यावी.

४८. कुपोषण व बालमृत्यू कमी करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या बाल मृत्यू समितीच्या (२००५) शिफारशींची अंमलबजावणी करण्यात यावी.

४९. जनजाति क्षेत्राकरिताच्या उत्पादनशुल्क धोरणाची (excise policy)व तंबाखू बंदीची जोमाने अंमलबजावणी करण्यात यावी.

५०. आदिवासींकरिता जातीची पडताळणी आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण कालबध्द रीतीने कठोरपणे अंमलात आणावे.

५१. वनांवरील सामूहिक हक्कांसह, आदिवासी गावांना व त्यांच्या विकासाकरिता हरित बोनस (Green Bonus) आणि कृषि व वन विकास यांमधून निधी देण्यात यावा.

## ६.४ नवीन शेतीपद्धती मधील भूमिका व आव्हाने

५२. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता प्रादेशिक पाणलोट क्षेत्र अभियान निर्माण करावे.

५३. पुढील दहा वर्षांमध्ये कोरडवाहू जमिनींची उत्पादकता वाढविण्याकरिता, कोरडवाहू जमीन कृषि विकास कार्यक्रमाची पाणलोट क्षेत्र अभियानासह, अंमलबजावणी करावी.

५४. विदर्भ व मराठवाड्याकरिता कापूस अभियान व पूर्व विदर्भाकरिता भात (धान) अभियानाची स्थापना करावी.

५५. विदर्भ व मराठवाडा या मागास प्रदेशांमधील फलोत्पादनाचा विकास करण्यासाठी, पुढील पाच वर्षांसाठी प्रादेशिक फलोत्पादन मिशनची शिफारस केली आहे.

५६. विदर्भ व मराठवाडा प्रदेशाच्या संपूर्ण विकासासाठी वैरण व पशुधन यांमध्ये स्थैर्य आणण्याकरिता पुढील पाच वर्षांसाठी विदर्भ व मराठवाड्यामध्ये वैरण व पशुधन विकास अभियानाची शिफारस केली आहे.

५७. लाभक्षेत्राचा सामाजिक आर्थिक विकास साध्य करण्यासाठी आंतरशाखीय दृष्टिकोन, संरचना व मनुष्यबळ असणारे नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरण निर्माण करण्यात यावे. पाणी नियंत्रण, पाणी सोडणे, पाण्याचा वापर, पीक नियोजन व कार्यक्षम पाणी वापर व कालव्यांचे परिरक्षण ही कामे नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात यावीत.

५८. ऊसासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांकरिता सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाच्या द्वारे एक अनिवार्य बदल करावयास हवा.

५९. सूक्ष्म सिंचन आणि यांत्रिकीकरण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता सर्व योजना आणि विभाग यांचे अंदाजपत्रक एककेंद्रभिमुख करून व सर्व योजनांचे त्यात विलिनीकरण करून त्याद्वारे "महाराष्ट्र कृषि अभियांत्रिकी कंपनी" निर्माण करावी.

६०. संपूर्णपणे वेगळी कृषिविषयक हवामानाची स्थिती असणाऱ्या पूर्व विदर्भ प्रदेशाच्या विकासाकरिता विदर्भातील चंद्रपूर येथे नवीन "कृषि व वनीकरण विद्यापीठा"ची शिफारस केली आहे.

६१. सदर प्रदेशाकरिता योग्य अशा कृषि अवजारांचे व साधनसामग्रीचे संशोधन करणे व ती विकसित करणे, त्याची चाचणी घेणे, प्रशिक्षण देणे व प्रात्यक्षिक करणे याकरिता महाराष्ट्र कृषि यांत्रिकी मिशनच्या छत्राखाली प्रत्येक राज्य कृषि विद्यापीठाला व प्रादेशिक कृषि यांत्रिकीकरण अभियानाला संलग्न अशी कृषि यांत्रिकीकरण संस्था स्थापन करावी.

६२. नवीन शेतीच्या मानवी साधनसंपत्तीच्या गरजा भागविण्यासाठी प्रत्येक तालुक्याकरिता एक कृषि महाविद्यालय आणि एक लाख लोकसंख्या असणाऱ्या गावांच्या समुहांसाठी एक कृषि तंत्रनिकेतन असावे अशी शिफारस केली आहे.

६३. राज्य कृषि विद्यापीठास संलग्न असेल अशी प्रत्येक प्रदेशासाठी व्यावसायिक कृषि प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात यावी.

६४. प्रत्येक प्रदेशाकरिता एक "शेतकरी महिला प्रशिक्षण" संस्था असावी.

६५. राज्यातील संशोधनाला चालना देण्यासाठी भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या धर्तीवर रु.५०० कोटींच्या प्रारंभिक अनुदानासह "महाराष्ट्र कृषि संशोधन परिषद" स्थापन करण्यात यावी व ती औरंगबाद येथे असावी.

६६. नवीन शेतीच्या गरजा भागविण्यासाठी प्रभारी विशेषीकृत विस्तारित सेवांकरिता प्रत्येक जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी जिल्हा विस्तार सेवा युनिटे निर्माण करण्यात यावीत.

६७. प्रदेशातील कृषि–उद्योगाच्या विकासावर भर देण्यासाठी, सध्याच्या महाराष्ट्र कृषि औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमएआयडीसी) जागी चार प्रादेशिक कृषि–उद्योग विकास महामंडळे (विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण) निर्माण करण्यात यावीत.

६८. जे एकत्रितपणे मोठ्या प्रमाणावर साधनसंपत्ती व उत्पन्न मिळवून देऊ शकतात, अशा वनीकरण, मत्स्यव्यवसाय व पशुसंवर्धन यांवर अतिशय कमी लक्ष दिले जाते व त्यांना साधनसंपत्तीही कमी दिली जाते यांमध्ये समतोल साधण्याची गरज आहे. शासनाने वनीकरणासाठी ही पुरेशी तरतूद करायलाच हवी.

६९. अतिरिक्त वनक्षेत्रांमधील प्रकल्पांकरिता पूरक वनसंपदा म्हणून वनक्षेत्र कमी असणाऱ्या प्रदेशांना आणि जिल्हयांना वनीकरणाच्यांसंबंधात लक्ष्य ठरवून द्यायलाच हवे. सर्व जिल्हयांमध्ये ३३ टक्के वनक्षेत्र असावे ही बाब राज्याच्या वन धोरणाशी सुसंगतच आहे.

## ६.५ औद्योगीकरणाचा प्रसार

७०. विदर्भ प्रदेशात वस्तुनिर्माण (manufacturing) कार्यक्रमास चालना देण्यासाठी व अधिकाधिक खाजगी गुंतवणुकीस मदत करण्यासाठी विशेषकरून विक्री करामध्ये **दोन टक्के** सूट देण्यात यावी व बँकींग क्षेत्राकडून उसनवारीने घेतलेल्या भांडवलावरील व्याजाचा दर एक टक्क्यांनी कमी करण्याची तरतूद करण्यात यावी.

७१. सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम क्षेत्रांकरिता भांडवल मिळण्यामध्ये सुधारणा करण्याकरिता सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम पत हमी महामंडळ निर्माण करण्यात यावे.

७२. मल्टीनोडल इंटरनॅशनल कार्गो हब अॅट नागपूर मिहानमध्ये मुक्त व्यापारी वखार साठवण क्षेत्र निर्माण करण्यात यावे.

७३. सूत गिरण्यांकरिता विणाई व कताई (Spinning & Weaving Mills) वीज एक महत्त्वाची आवश्यक मूलभूत गोष्ट आहे. विदर्भाला २६ नवीन वीज संयंत्रे (पॉवर प्लॅण्टस) मिळणार आहेत आणि अशी शिफारस करण्यात येते आहे की, या वस्त्रोद्योग युनिटांसाठी विदर्भाला लागून असलेल्या राज्यांच्या दरांशी तुलनायोग्य असे दर देण्यात यावे.

७४. विदर्भ प्रदेशात असलेले अनेक अनुकूल घटक पाहता (लक्षात घेता), कापसाचे मूल्य वाढवण्याबरोबर २ लाख जनतेला एक लाभदायी रोजगार मिळवून देण्यासाठी ग्रामीण क्षेत्रात लघुउद्योग म्हणून खादी, हातमाग आणि त्याच्याशी संबंधित कापड व्यवसाय निर्माण करण्यासाठी चालना देण्यात यावी.

७५. प्रादेशिक पर्यटन विकास महामंडळामार्फत पर्यटन उद्योगास विशेष करून आणि जोमदारपणे चालना द्यावी.

७६. वन उत्पादने आणि उत्पन्न यांतील मूल्यात भर घालण्याबरोबरच आदिवासी लोकांना रोजगार मिळवून देता यावा म्हणून वनसंपन्न जिल्हयांमध्ये वन-उत्पादनावर आधारित लहान व मध्यम उद्योग विकसित करण्यात यावेत.

७७. ज्वारीपासून तयार होणारी इतर उत्पादने, फळे, तेलबिया व डाळी, सोयाबीन व सोया उत्पादने आणि दूध व दुग्धजन्य पदार्थ यांचे संस्करण याकरिता खास त्यांच्यासाठीच असतील अशी विशेषीकृत अन्न संस्करण पार्कस् उभारण्यात यावीत.

७८. राज्य शासनाने, परभणी-हिंगोली-वाशीम हा संपूर्ण प्रदेश 'वस्त्रोद्योग प्रदेश' म्हणून जाहीर करावा आणि या जिल्हयांसाठी एक विशेष एकत्रित धोरण लागू करावे.

७९. आधुनिक पर्यावरणानुकूल व आरोग्यपूर्ण यंत्रसामग्री बसविण्यासाठी, विशेषकरून कापूस सरकी काढणे व दाबणी (जीनिंग व प्रेसिंग) यांचा दर्जा सुधारण्यासाठी तंत्रज्ञानविषयक निधी उभारण्यात यावा.

८०. महाराष्ट्राने आपले "सौर धोरण" लवकर जाहीर करावे. तामिळनाडू, राजस्थान आणि गुजरात यासारखी बरीच राज्ये याबाबतीत पुढाकार घेऊन यशस्वी झाल्याची उदाहरणे आहेत.

८१. दूरगामी विकासाचे पैलू लक्षात घेऊन ते पूर्ण करण्यासाठी शहरातील रस्ते, उड्डाणपूल, पाणी पुरवठा, मलनि:सारण, परिवहन आगार, क्रीडा संकुल, उद्योग केंद्रे, पर्यटकांना आकर्षित करणारी स्थळे आणि हरित शहर बनवणे यांकरिता एक स्वतंत्र औरंगाबाद प्रादेशिक विकास प्राधिकरण स्थापन करण्याची गरज आहे.

८२. शेंद्रा आणि जालना यांमधील औद्योगिक वसाहतीसह औरंगाबाद-जालना हा एक औद्योगिक पट्टा, म्हणून विकसित करावा.

## ६.६ जलसंपत्तीचा विकास

८३. पाण्याच्या बाबतीतील अंदाज व शिफारशी या फक्त आठ वर्षांच्या पहिल्या टप्प्यांकरिताच आहेत. या कालावधीत, सिंचनाची कमाल व समन्याय पातळी गाठण्यासाठी सिंचनातील तूट आणि व्याप्ती यांची संपूर्ण पडताळणी करून पुन:अंदाज बांधण्यात यावा आणि ५ वर्षानंतरचे साधनसंपत्तीचे नियतवाटप ठरविण्यात यावे.

८४. प्रत्यक्ष सिंचनाचे क्षेत्र आणि पाण्याचा साठा या दोन गोष्टी गणनेच्या कोणत्याही प्रयोजनासाठी सिंचनाच्या विकासाचा निर्देशांक म्हणून विचारात घेण्यात याव्यात.

८५. "सिंचित जमीन" याची व्याख्या, अशी जमीन जिला वर्षभरातील किमान ८ महिने तरी खात्रीलायकरीत्या पाणीपुरवठा होतो, अशी करावी.

८६. जल विकासाची चार महत्त्वाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :-

(एक) सर्व विभागांमधील सिंचनाची पातळी, जास्तीत जास्त विभागीय पातळीइतकी (पुणे) किंवा न्यायाधिकरणाद्वारे अनुज्ञेय असेल अशा पातळीपर्यंत पोहचविणे.

(दोन) अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक आणि कोकण विभागांमध्ये प्राथम्य तत्त्वावर ही पातळी गाठणे.

(तीन) पुढील ५ वर्षांमध्ये दिसून येणाऱ्या चार क्षेत्रातील (पृथकपणे पाण्याचे दुर्भिक्ष असलेले तालुके, "***भूस्तर प्रतिकूल तालुके***", "***खार पाण पट्टा***" आणि "***माजी मालगुजारी तलाव***")विशिष्ट समस्या सोडविणे.

(चार) वन हक्क अधिनियम किंवा प्रशासकीय/राजकीय इच्छा यांनी लादलेल्या मर्यादांवर मात करणे आणि स्थानिक जनतेच्या गरजा भागवण्यास प्रथम प्राथम्य देऊन पूर्व विदर्भ आणि कोकणामध्ये पाण्याचा पुरेपूर वापर करणे.

८७. ग्रामीण तसेच शहरी भागांमध्ये उपलब्ध करून द्यावयाच्या किमान प्रमाण दरडोई १४० लिटर इतके असावे. ग्रामीण क्षेत्रात १४० लिटर्समध्ये पशुधन पाण्याच्या गरजेचाही समावेश आहे.

८८. पाणलोट जमिनीचा विकास करण्यासाठीच्या वित्तीय प्रमाणामध्ये वाढ करायला हवी आणि ते प्रति हेक्टर्स रु. २५,००० इतके करायला हवे.

८९. पाण्याच्या उपलब्धतेच्या बाबतीत तापी नदीचे खोरे हे पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेले खोरे आहे. अशाप्रकारे, नर्मदेच्या पाण्याचा राज्याचा अतिरिक्त हिस्सा कमी पाणी असणाऱ्या खानदेश प्रदेशाकरिता वापरण्यात यावा.

९०. कसदार काळी मृदा आणि "खार पाण पट्टा" अमरावती प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. या प्रदेशाकरिता तांत्रिक व आर्थिक प्रकल्पासाठी असलेल्या प्रकल्प निकषांमध्ये सुधारणा करायला हवी.

९१. पश्चिम महाराष्ट्रामध्ये, कायमस्वरूपी पाण्याचे दुर्भिक्ष्य असणाऱ्या प्रदेशांकरिता जास्त उंचीवर पाणी उचलावयास (lifting of water at higher heights) "एक विशेष बाब" म्हणून मंजुरी देण्यात यावी आणि पाणलोट विकासासाठी सर्वात जास्त प्राधान्य द्यायला हवे.

९२. पश्चिम महाराष्ट्रातील डोंगराळ प्रदेशांसाठी, पाण्याचे वितरण पाईप लाईनद्वारे करण्यात यावे.

९३. कोकण प्रदेशात "जल कुंड" आणि लघु-सिंचन योजना तातडीने राबविण्यात याव्यात.

९४. कोकण प्रदेशात, पूर नियंत्रणाकरिता स्वतंत्र व विशेष तरतुदीचां शोधघेण्यात याव्यात.

९५. मराठवाडा प्रदेशाकरिता, न्यायाधिकरणाचा निवाडा पाण्याच्या वापराचे प्रमाण निर्बंधित करतो. या निवाड्याचे पुनर्विलोकन करणे गरजेचे आहे.

९६. विदर्भ प्रदेशाकरिता, वन जमीन संपादित करणे, वनांतून विस्थापित करणे आणि वनांची जागा याकरिता आवश्यक असणारी रक्कम सध्याच्या निव्वळ मूल्याच्या (एनपीव्ही) आधारे प्रदान करण्याची गरज आहे. अशी रक्कम प्रदेशामधील प्रकल्प खर्चात न आकारता पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प यासारखी आकस्मिकता निधीमधून आकारण्यात यावी.

९७. राज्यातील कमी वने असणाऱ्या प्रदेशांमध्ये आणि जिल्ह्यांमध्ये पूरक वनीकरण करण्यात यावे. जेणेकरून, सिंचनातील तसेच जंगलांनी व्यापलेल्या क्षेत्रातील प्रादेशिक समतोल साधता येईल.

९८. विदर्भ प्रदेशामधील "माजी मालगुजारी" तलावांचे नूतनीकरण करण्यात यावे आणि त्यांची साठवण क्षमता देखील वाढवण्यात यावी. जेणेकरून एक लाख हेक्टर्स पेक्षा अधिक जमीन सिंचनाखाली येईल.

९९. पाण्याखाली गेलेल्या प्रदेशांमधील वनक्षेत्र हे ०.५ पेक्षाही कमी आहे अशा प्रकल्पांच्या बाबतीत (उदा.तुलतुली, कारवाफा यासारखे विदर्भातील सिंचन प्रकल्प) राज्यपालांची विशेष परवानगी घेण्यात यावी.

१००. वैनगंगा-प्राणहिता-इंद्रावती खोऱ्यामधीलनियोजन न केलेल्या जलसंपत्तीचे पुढील पाच वर्षांमध्ये नियोजनकरण्यात यावे.

१०१. विदर्भामधील अपूर्ण असलेले प्रकल्प प्राथम्यक्रमाने तातडीने पूर्ण करण्यात यावेत आणि वैनगंगा व तिच्या उपनद्यांमधील जलसंपदाही बंधारे व उपसाजलसिंचनाद्वारे वापरण्यात यावी.

१०२. पाण्याच्या प्रदूषणास प्रतिबंध करण्यासाठी, सर्व सिंचनेतर वापर व पाणी वापरकर्तेयांच्याकरिता पुनश्चक्रण व पुनर्वापर करणे अनिवार्य करावे.

१०३. कालवा वितरण प्रणालींमधून पाणी झिरपणे व पाणी वाया जाणे कमी करण्यासाठी बंद पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्याची शिफारस केली आहे.

१०४. भूजल हा सिंचनाचा एक महत्त्वाचा भाग आहे, म्हणून तो एक स्वतंत्र विकास निर्देशांक () म्हणून समजण्यात यावा.

१०५. सर्व खोऱ्यांतील व उप-खोऱ्यांतील संकल्पन व प्रकल्प नियोजन हे ५० टक्के अवलंबिता तत्त्वाच्या निकषावर करण्यात यावे.

१०६. पाणी साठवण्याच्या निर्देशांकानी मोजणी केल्यानुसार अमरावती व औरंगाबाद विभागाला गंभीर तूट सोसावी लागते. अशा गंभीर तुटीवर उपाय म्हणून, स्थानिक क्षेत्रातील सर्व सिंचन प्रकल्प (म्हणजे २५० ते ६०० हेक्टर्सचे प्रकल्प) मंजूर करावेत आणि पाण्याच्या उपलब्धतेच्या संबंधातील सध्याचे विनियम आणि इतर पर्यावरणीय विनियम शक्यतोवर, शिथिल करावेत.

१०७. पाण्याची उपलब्धता प्रति हेक्टर जेथे ३००० घन मीटरपेक्षा कमी आहे अशा सर्व प्रदेशांसाठी पीक पध्दतीचा गंभीरपणे पुनर्विचार करण्यात यावा. ज्यांना सर्वात जास्त प्रमाणात पाणी लागते अशा सर्व पिकांना (उसासह) क्षेत्राच्या प्रमाणावर एक कमाल मर्यादा किंवा उच्चतर सीमा असावी.

१०८. दहा वर्षातून एकदा जेथे ४०० मी.मी. पेक्षा कमी पाऊस होतो अशी वर्षाची वारंवारता असणाऱ्या प्रदेशात, पाईपलाईनद्वार पाणी फिरवण्याकरिता विकास योजनेत विशेष तरतूद करण्यात यावी.

१०९. मोठ्या, मध्यम व लहान प्रकल्पांसह सर्व सिंचन प्रकल्पात, त्यांच्या सिंचन विकास कार्यक्रमामध्ये लाभक्षेत्र

विकासाची संकल्पना असावी. त्यानुसार, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणात योग्य ते बदल करण्यात यावेत आणि ते पुनर्जीवित करण्यात यावे. असे नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरण कृषि अभियंता, कृषि अर्थतज्ज्ञ, कृषि विस्तार अधिकारी, विभागामधील सहकार पणन व वखार साठवण अधिकारी यांसह बहुशाखीय स्वरूपाचे असावे. पाण्याच्या घनतेनुसार व्यवस्थापन व पाणी देणे हे नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाकडे सोपवायला हवे.

११०. पाण्याच्या पात्राचा एकात्मीकृत सर्वसमावेशक विकासाकरिताच्या योजना, येत्या ५ वर्षात तातडीने पूर्ण कराव्यात आणि महाराष्ट्र जलसंपदा विनियमन प्राधिकरणाने अशा सर्वसमावेशक आराखड्यात वेगवेगळया वापरांसाठी पाण्याचे समन्याय वाटप विहित करावे.

१११. सध्याच्या प्रशासकीय यंत्रणेने, सिंचनाकरिता व सिंचनेतर प्रयोजनांसाठी घनतेच्या आधारावर असलेल्या पाणी वाटपाच्या तत्त्वांचे कडकपणे पालन करावे आणि पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेमध्ये सुधारणा करावी.

११२. महाराष्ट्र शासनाने, लाभार्थींकडे सिंचन व्यवस्थापन सोपवण्याचे धोरण आधीच स्वीकारलेले आहे. सामाजिक सहभागाने पाण्याचे वाटप करण्यासाठी व्यवस्थापन संस्था स्थापन करणे हे सर्वोच्च प्राधान्याने विचारात घ्यावे. येत्या ५ वर्षात, अशा संस्था निर्माण करण्याची व त्या बळकट करण्याची एक विशेष मोहीम हाती घेण्यात यावी.

११३. शास्त्रीय जलधारी मानचित्रणाच्या (scientific aquifer mapping) आधारावर पर्जन्य जलसंचयन उपक्रम हाती घेण्यात यावेत. प्रत्येक ठिकाणाला व स्थितीला योग्य अशा आवश्यक त्या उपाययोजना भूजल तज्ज्ञांच्या शिफारशींच्या आधारावर तयार कराव्यात.

## ६.७ आरोग्य : सार्वत्रिकीकरणाद्वारे समतोल राखणे

११४. आरोग्य क्षेत्रात प्रादेशिक असमतोल आहे. तुटीच्या मोजमापाच्या परिभाषेत आरोग्याची अंदाजित तूट ही विदर्भ (१२१.८), मराठवाडा (१०८.९) आणि उर्वरित महाराष्ट्र (६९.३) इतकी आहे.

११५. राज्यातील ग्रामीण (जनजातीसह) लोकसंख्येकरिता चार टप्प्यांमध्ये सार्वत्रिक आरोग्य देखभाल केंद्रे सुरू करावीत.

११६. पहिल्या टप्प्यात, १८० पेक्षा कमी आरोग्यविषयक गुण असणाऱ्या आठ जिल्ह्यांचा समावेश करावा.

११७. पुढच्या टप्प्यात, २०० पेक्षा कमी आरोग्य गुण असणाऱ्या आणखी नऊ जिल्ह्यांपर्यंत (एकूण सतरा) सार्वत्रिक आरोग्य देखभाल केंद्रांची व्याप्ती वाढवावी.

११८. तिसऱ्या टप्प्यात, २२० पेक्षा कमी गुण असणाऱ्या एकूण तेवीस जिल्ह्यांतील ग्रामीण लोकसंख्येचा समावेश करण्यात यावा.

११९. सरतेशेवटी, चौथ्या टप्प्यात, सर्व तेहतीस जिल्ह्यांतील ग्रामीण लोकसंख्येचा समावेश करावा.

१२०. चौदाव्या योजनेच्या कालावधीपर्यंत, नागरी लोकसंख्येसह संपूर्ण राज्य सार्वत्रिक आरोग्य देखभाल केंद्रांतर्गत आणावे.

१२१. आर्थिक सुविधा पुरवणे, आरोग्याची काळजी घेणे, आरोग्याकरिता मनुष्यबळ, व्यवस्थापन सुधारणा, सामूहिक सहभाग व औषधे/लसीकरण यांसह सार्वत्रिक आरोग्य देखभाल केंद्रे सुरू करण्यासंबंधातील अनेक शिफारशींचे काळजीपूर्वक नियोजन करण्यात यावे आणि ती केंद्रे सुरू करण्यात यावीत.

## ६.८ शिक्षण: शिक्षणाच्या हक्कापलीकडले

१२२. शिक्षणाच्या हक्कातील प्रमुख प्रत्यक्ष पायाभूत सोयीसुविधांची विहित केलेली मानके व प्रमाणके आणि इतर काही राज्यातील राज्य शासनाची धोरणविषयक कागदपत्रे संपादित केली पाहिजेत आणि ती सांभाळून ठेवली पाहिजेत

आणि यासंबंधात शून्य सह्यता धोरण (zero tolerance policy) स्वीकारावे. याकरिता राज्य शासनाने पुरेशी वित्तीय तरतूद केली पाहिजे.

१२३. विद्यमान धोरणांसाठी, समितीने गुणवत्तेच्या पैलूवर सर्वात जास्त लक्ष देण्याची आणि खास करून महिलांसारख्या (विशेषत: मराठवाड्यातील) दुबळ्या घटकांशी संबंधित असणाऱ्या, मागे पडणाऱ्या घटकांना सामावून घेण्यासंबंधात एक मिशन पध्दतीचा दृष्टिकोन बाळगण्याची शिफारस केली आहे.

१२४. समितीने, शालेय शिक्षणाची किमान पातळी म्हणून इयत्ता आठवी ते दहावी पर्यंतच्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची शिफारस केली आहे.

१२५. प्रदेश विशिष्ट अभ्यासक्रम देणारी आणि शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये निर्वेध प्रवेश मिळण्याची शक्यता असणारी सामूहिक महाविद्यालये (Community Colleges) सुरू करावीत.

१२६. प्रत्येक गटासाठी एक सामूहिक महाविद्यालय सुरू करावे. ही गोष्ट पाच वर्षात पूर्ण करण्यात यावी. या प्रयोजनासाठी राज्याच्या स्वत:च्या निधीखेरीज राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानाच्या निधीचा कमाल मर्यादेपर्यंत वापर करण्यात यावा.

१२७. सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि सर्वसाधारणपणे जिल्हे यांना परिचारिका महाविद्यालये संलग्न असावीत. आरोग्यसेवेतील सध्याच्या मनुष्यबळाला पूरक होण्यासाठी बी.एससी. सामुदायिक आरोग्यविषयक अभ्यासक्रम सुरु करण्यात यावा.

१२८. विविध टप्प्यांवर कौशल्य विकासाकरिता द्यावयाच्या योजना प्रमाणकांकरिता (scheme vouchers) तरतुदींसह कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रोत्साहनाधारित योजना (IBSSA) सुरू करण्यात यावी. या प्रोत्साहन योजनांमुळे, तरुणांमधील रोजगार निर्मितीक्षमता वाढीस लागेल व स्वयं-रोजगारात वाढ होईल.

१२९. या योजनेमध्ये, दोन वेगवेगळ्या टप्प्यांवर कौशल्य विकासासाठी प्रमाणके (व्हाऊचर) देण्यात येऊ शकतील. जे दहावी इयत्ता उत्तीर्ण झाले आहेत. ते रु.१०,००० करिता हक्कदार असतील. मात्र, त्यांनी राज्याच्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी विनिर्दिष्ट केलेल्या व्यवसायाकरिता शासन मान्यताप्राप्त संस्थांमध्ये प्रवेश घेतलेला असावा. प्रमाणपत्र अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर त्यांना रु.१०,००० इतके अतिरिक्त वित्तीय सहाय्य देण्यात येईल.

१३०. पायाभूत सोयीसुविधांचा दर्जा व त्यांचे परिरक्षण (विशेषत: मुलींकरिता असणारी प्रसाधनगृहे योग्य वापर नसलेली दिसून येतात) हे जिल्ह्या-जिल्ह्यानुसार बदलते आणि ती अतिशय दुरावस्थेत आहेत. इमारती व इतर पायाभूत सोयीसुविधांचे बांधकाम करण्याकरिता व त्यांचे परिरक्षण करण्याकरिता संस्थात्मक व्यवस्था जर बदलण्यात येणार नसेल तर ती मजबूत करण्याची गरज आहे. सध्या, वापरकर्तेयाबाबत फारसे काही बोलत नाहीत आणि जिल्हा परिषदा या दोन्ही स्तरावर शिक्षण विभागांतर्गत एक स्वतंत्र संस्था निर्माण करणे, हा कदाचित तोडगा असू शकेल.

१३१. शाळा गुणांकन पध्दती, विशेषेकरून माध्यमिक स्तरावर सुरू करण्यात यावी. ही पध्दती खाजगी त्याचप्रमाणे निधी पुरवण्यात येणाऱ्या सार्वजनिक शाळा या दोघांसाठीही बंधनकारक करता येईल.

१३२. विविध व्यावसायिक व तंत्र शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे पुनर्विलोकन करण्याची सध्याची व्यवस्था बळकट करण्याची गरज आहे.

१३३. राज्याच्या विविध भागातील नामांकित संस्थांना मागासक्षेत्रात, त्यातही खास करून जनजाति क्षेत्रात, त्यांचे शैक्षणिक परिसर सुरू करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. यात माध्यमिक आणि तंत्रशिक्षण अशा दोन्ही स्तरावरील शिक्षणाचा समावेश असावा.

१३४. शाळांकडून देण्यात येणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेचे मोजमाप करण्याच्या दृष्टीने, इयत्ता आठवीपर्यंत परीक्षा न घेण्याच्या शासनाच्या सध्याच्या धोरणाचा पुनर्विचार करणे गरजेचे आहे.

१३५. खाजगी विद्यापीठे विधेयक मंजूर करावे आणि राज्याच्या मागासभागात खाजगी विद्यापीठे स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने प्रोत्साहन द्यावे.

१३६. इयत्ता सातवी पर्यंतच्या स्तरावर प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी खाजगी क्षेत्र प्रमुख भूमिका बजावत असताना, माध्यमिक शिक्षण व तंत्र व व्यावसायिक शिक्षणाच्या स्तरावरील खाजगी क्षेत्राचा प्रवेश हा शिक्षणाची गुणवत्ता व विद्यार्थ्यांची सेवायोजना अभिमुखता सुधारण्यामध्ये भरच घालील.

## ६.९ संपर्क जाळे विस्तृत करणे

१३७. अशी शिफारस करण्यात येत आहे की, राज्याने योजना केल्याप्रमाणे असे करावे की, राज्यातील ७०३५ कि.मी. इतक्या एकूण रुंदीचे सोळा रस्ते अशाप्रकारे विकसित करावेत की राज्याचे पूर्वेचे टोक पश्चिमेच्या टोकाला जोडले जाईल व उत्तरेचे टोक दक्षिण टोकाला जोडले जाईल.

१३८. त्यांनतर हे जाळे, आंतरराज्यीय संपर्क आणि व्यावसायिकीकरणासाठी राष्ट्रीय महामार्गामध्ये रूपांतरित करावे.

१३९. मुंबई–नाशिक हा १५० कि.मी. चा द्रुतगती महामार्ग लवकरात लवकर बांधण्यात यावा.

१४०. मालवाहतुकीचेएक साधन म्हणून रेल्वेचा विचार करावा अशी शिफारस केली आहे. जरी त्याचा अर्थ रेल्वे मार्गाचे बांधकाम करण्यासाठी केंद्र सरकारला मदत करणे असा होत असला तरी, राज्य शासनाने यामधील आपली गुंतवणूक अजून वाढवावी, जेणेकरून वेगाने आर्थिक प्रगती होण्यासाठी मदत करण्याकरिता आवश्यक त्या पायाभूत सोयीसुविधांचा विकास करता येईल.

१४१. बंदर विकासाची संपूर्ण आर्थिक क्षमता वापरण्यात यावी, अशी शिफारस केली आहे. ज्यामुळे विविध मार्गाने स्थानिक अर्थव्यवस्थेचा तसेच महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा विकास होऊ शकेल.

१४२. खाजगी विकासकांमार्फत बंदरे परस्परांशी जोडून त्यांचा विकास करण्याचा ज्यात अंतर्भाव आहे असे बंदर धोरण राज्याने जाहीर केलेले असले तरीही, खाजगी विकासक पुढे येऊन ते विकास करतील याची वाट न बघता राज्याने स्वत:च बंदरांना परस्परांशी जोडून त्यांचा विकास करण्याचे काम आपल्या हाती घ्यावे, अशी जोरदार शिफारस करण्यात येत आहे.

१४३. राज्य शासनाने रत्नागिरी ते नागपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने पाठपुरावा करावा.

१४४. बांधकाम सुरू असलेला सागरी महामार्गासाठी अधिक साधनसामग्रीचे नियतवाटप करून ते प्राथम्यक्रमाने पूर्ण करावा.

१४५. अपुरे असलेले हवाईमार्गांचे जाळे व मोठ्या विमानतळ विकासाच्या कार्यान्वयनाचा स्थानिक अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम पाहता, शासनाने निश्चित केल्याप्रमाणे बावीस ठिकाणांच्या विमानतळांचा विकास त्वरेने करावा अशी शिफारस केली आहे.

१४६. भारत सरकारने मोठ्या प्रमाणावर "ब्रॉडबँन्ड कनेक्टीव्हिटी" चा कार्यक्रम हाती घेतला आहे. राज्याने प्राथम्य देऊन, माहिती तंत्रज्ञान विभागाला (संबंधित प्रादेशिक भाषेतील सॉप्टवेअर विकसित करण्याकरिता) अतिरिक्त साधनसंपत्ती पुरविली पाहिजे जेणेकरून लवकरात लवकर त्याचे फायदे मिळतील आणि त्यामुळे प्रादेशिक असमतोल शीघ्रगतीने कमी होण्यास/दूर होण्यास मदत होईल.

**डॉ.अभय पेठे,**
सदस्य

**श्री.विजय बोराडे,**
सदस्य

**डॉ.अभय बंग,**
सदस्य

**डॉ.माधव चितळे,**
सदस्य

**डॉ.विनायक देशपांडे,**
सदस्य

**डॉ.श्रीमती संगिता कामदार,**
सदस्य

**डॉ.दिलिप नाचणे,**
सदस्य

**डॉ.व्ही.एम.मायंदे,**
सदस्य

**डॉ.संजय चहांदे,**
महासंचालक, यशदा
सदस्य

**श्री.के.पी.बक्षी**
अपर मुख्य सचिव,
नियोजन विभाग,
सदस्य-सचिव

**डॉ.विजय केळकर,**
अध्यक्ष
मुंबई.
दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३